दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-१४१ | बुधवार दि.११ सप्टेंबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने- ६ | किंमत ३ रूपये




# शेतकऱ्यांना सानुग्रह अनुदान देण्यास टाळाटाळ!

## कृषीमंत्र्यांना जाग येणार कधी? शेतकरी नेत्यांची जोरदार टीका; माजी खासदार राजू शेट्टी, संभाजीराजे छत्रपती, आमदार बच्चू कडू यांनी केली नुकसानीची पाहणी

**परभणी । प्रतिनिधी**

**पुरग्रस्त भागातील अनेक कुटूंबे उघड्यावर पडलेली आहेत. जमीनी खरडून गेल्याने मोठे नुकसान झाले आहे. शासनाकडून पुरग्रस्तांना वाऱ्यावर सोडण्यात आले असून जवळपास आठ ते दहा दिवस झाले तरीही लोकांना सानुग्रह अनुदान देण्यात आले नाही. मराठवाड्यात अतिवृष्टीमुळे एवढ्या मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. तर दुसरीकडे राज्याचे कृषीमंत्री धनंजय मुंडे १० दिवसांच्या सांस्कृतिक कार्यक्रमात व्यस्त आहेत, हे महाराष्ट्रासाठी भूषणावह नाही, अशी टीका स्वराज्य पक्षाचे प्रमुख संभाजीराजे छत्रपती यांनी केली.**

माजी खासदार राजू शेट्टी यांच्यासह माजी खासदार संभाजीराजे छत्रपती, आमदार बच्चू कडू यांच्यासह शेतकरी नेत्यांनी मानवत तालुक्यातील वाझूर, सावली या नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली. अतिवृष्टीने शेतकरी हतबल झालेला असून शासनाने नुकसानग्रस्तांना तातडीने मदत देण्याची गरज असल्याची भावना तिघांनीही व्यक्त केली. यावेळी आमदार बच्चू कडू म्हणाले की, सरकारने यामध्ये गांभीर्याने लक्ष घालून पिकविमा कंपन्यांना तातडीने संरक्षित रक्कम शेतक-यांच्या खात्यावर जमा करण्याबाबत आदेश देणे गरजेचे असून ज्या शेतक-यांनी पिकविमा उतरविला नाही त्यांना २०१९ च्या धर्तीवर मदत करण्याची मागणी करण्यात आली. आमदार



### तर शेतकरी मोर्चा काढणार - राजू शेट्टी

**गेल्या आठवड्यात झालेल्या परभणी जिल्ह्यातील अतिवृष्टीने सोयाबीन, कापूस, उडीद, तूर व मक्का पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. आठ दिवस झाले तरीही शासनाने अजूनही सानुग्रह अनुदान दिले नाही, पडझडीचे पंचनामे सुरू केलेले नाही. येत्या आठ दिवसात सदरचे अनुदान खात्यावर जमा न झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालयावर पुरग्रस्तांना घेऊन मोर्चा काढणार असल्याची माहिती स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे संस्थापक राजू शेट्टी यांनी दिली.**

पान २ वर

## आमदार अपात्रता प्रकरण: सुनावणी पुन्हा लांबणीवर

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

शिवसेनेसह राष्ट्रवादी काँग्रेस आमदार अपात्रता प्रकरणाची सुनावणी मंगळवारी सर्वोच्च न्यायालयात पार पडणार होती. मात्र खंडपीठासमोर असलेले पहिलेच प्रकरण दीर्घकाळ चालल्याने यावर सुनावणी होऊ शकली नाही. पुढील आठवड्यात १८ सप्टेंबरला या दोन्ही प्रकरणांवर सुनावणी होण्याची शक्यता आहे.



राष्ट्रवादीसह शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणात या दोन्ही आमदार अपात्रता प्रकरणांची सुनावणी एकाच वेळी घ्यायची, असे सर्वोच्च न्यायालयाने ठरवले होते. त्यानुसार दोन्ही प्रकरणांच्या सुनावणीसाठी १० सप्टेंबर ही तारीखही देण्यात आली होती. मात्र यावेळीही सुनावणी होऊ शकली नाही.

दरम्यान, यापूर्वीही या प्रकरणावरील सुनावणी पुढढकलण्यात आली होती. पुढच्या काही काळात महाराष्ट्र विधानसभेची निवडणूक होत आहे. त्यामुळे विधानसभा निवडणुकीपूर्वी आमदार अपात्रता प्रकरणाचा निकाल लागणार की नाही, याबद्दल आता राजकीय वर्तुळात विविध तर्क वितर्क सुरू झाले आहेत.

# मी शहीद होण्यास तयार!

## मनोज जरांगेंचा पुन्हा एल्गार; १६ सप्टेंबरपासून उपोषण करणार

**जालना । प्रतिनिधी**

**मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या एक दिवस अगोदर म्हणजेच १६ सप्टेंबर रोजी मध्यरात्री पासून उपोषणाची सुरुवात करणार असल्याची घोषणा केली आहे. ओबीसीतून आरक्षण देण्याची मागणी त्यांनी लावून धरली आहे. गेल्या दोन-तीन दिवसांत अंतरवाली सराटीत मोठ्या घडामोडी घडल्या. मंत्री अब्दुल सत्तार यांनी त्यांची भेट घेतली. त्यांचा निरोप घेऊन ते मुख्यमंत्र्यांना भेटले. त्यानंतर धनंजय मुंडे हे सुद्धा अंतरवाली सराटीत जाऊन आल्याचे सांगण्यात येत आहे. काही आमदार माझे तुकडे करणार असे म्हटले, मी शहीद होण्यास तयार आहे, असेही जरांगे पाटील यावेळी म्हणाले.**



मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा एकदा मराठा आरक्षणासाठी एल्गार पुकारला आहे. त्यांनी पुन्हा एकदा मराठा आरक्षणासाठी उपोषणाचे हत्यार उपसले आहे. मराठा समाजाला ओबीसींतून आरक्षण द्यावे आणि सगेसोयरे अध्यादेशाची अंमलबजावणी करावी यासाठी सरकारने कोणतीही स्पष्ट भूमिका जाहीर न केल्याने जरांगे पाटील यांनी ही घोषणा केली आहे. जरांगे पाटील यांनी अचानक उपोषणाचे हत्यार उपसले आहे. यावेळी जरांगे पाटील यांनी मराठा सामाजातील तरुणांना जीवन संपवण्यासारखं टोकाचे पाऊल न उचलण्याचे आवाहन केले. कोणत्याही कारणामुळे

पान २ वर

### ही तर फडणवीसांची शाळा

**आ. राऊत जे काही बोलत आहेत हे सगळे राजकीय स्टेटमेंट आहे. हा माझ्या विरोधात रचलेला ट्रॅप आहे. ही सगळे देवेंद्र फडणवीस यांची शाळा आहे, फडणवीस यांना मराठ्यांचे आमदार हाताशी धरून हे आंदोलन फोडायचे आहे. माझ्याकडे पाच-सहा आमदार आले, म्हटले तुमच्या आणि फडणवीस यांच्यात समन्वय घडवून आणायचा आहे. नंतर मतदारसंघात जाऊन माझ्या विरोधात बोलायला लागले. मी समाजासाठी मागणी करतो म्हटल्यावर मला कोणी तरी विरोध करणारच ना, लोकांनी तुम्हाला पण निवडून दिलेच की, ज्या लोकांनी तुम्हाला सोडून मतदान केले त्याला तुम्ही मारायला लागलेत. तुम्हाला पक्षाकडून बोलावे वाटते, मला माझ्या समाजाकडून बोलावे लागते. असे ते म्हणाले.**

## जालन्यात धारदार शस्त्राने वार करुन हमालाचा खून

**जालना । प्रतिनिधी**

हमालच काम करणारा एका व्यक्तीचा जालना शहराजवळील जामवाडी परिसरात तरुणाची निर्घृणपणे खून करण्यात आला. सदरील व्यक्तीचा खून ५/ ६ जणांच्या टोळक्याने केल्याचे समजते शेख हाफिज शेख हबीब असं खून झालेल्या तरुणाचं नाव आहे. शेख हा जालन्यातील कन्हैया नगरमध्ये राहत होता. जामवाडी शिवारातील एका ढाब्यावर असलेल्या रूममध्ये टोळक्यांनी शेखची खून केली. याप्रकरणी स्थानिक गुन्हे शाखेने एका संशयीताला ताब्यात घेतलं आहे. तसच जालना पोलिसांनीही इतर संशयितांना ताब्यात घेतल्याची समजते . खून कोणत्या कारणामुळे करण्यात आला याचे कारण समजू शकले नाही.



# अजित पवारांचा फोटो काळ्या कापडाने झाकला!

## बारामतीत शिंदे गट-राष्ट्रवादी आमनेसामने




**बारामती । प्रतिनिधी**

**बारामतीत शिवसेना शिंदे गटाकडून आयोजित एकनाथ गणेश फेस्टीव्हलला उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी हजेरी न लावल्याने संतापलेल्या जिल्हाप्रमुख सुरेंद्र जेवरे यांनी त्यांनीच लावलेल्या कमानीवरील उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा फोटो काळे कापड टाकून झाकल्याने येथील भिगवण चौकात तणावाचे वातावरण निर्माण झाले. पोलिसांनी वेळीच हस्तक्षेप करत जेवरे यांना ताब्यात घेतले.**

या प्रकारानंतर नगरपरिषदेने भिगवण चौकात जेवरे यांनी उभी केलेली कमान व त्यावरील छायाचित्रे काढून घेतली. या प्रकारावरून शिवसेना विरुद्ध राष्ट्रवादी आमनेसामने आल्याची स्थिती

पान २ वर

### यामुळे टाकला काळा कपडा...

**भिगवण चौकासह शहरात त्यांनी कमानी उभ्या केल्या आहेत. त्यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांची छायाचित्रे लावली आहेत. परंतु पवार यांनी महायुतीतील घटक पक्षाच्या कार्यक्रमाकडे पाठ फिरवल्याने अजित पवार यांच्या छायाचित्रावर काळा कपडा टाकण्यात आला.**

## अपघातातील गाडी चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मुलाचीच !



**नागपूर । प्रतिनिधी**

नागपुरात रविवारी मध्यरात्रीच्या सुमारास भरधाव वेगाने धावणाऱ्या एका ऑडी कारने दोन अन्य कार आणि एका दुचाकीला धडक दिल्याचे प्रकरण समोर आले आहे. सुदैवाने यात कुठलीही जीवितहानी झाली नाही. मध्यरात्रीच्या सुमारास घडलेल्या या अपघाताच्या घटनेने शहरात एकच खळबळ उडाली असताना आता या घटनेला राजकीय वळण लागले आहे.

अपघातातील ऑडी कार ही भाजप नेते आणि प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर

पान २ वर

### चंद्रशेखर बावनकुळे यांचा कबुलीनामा...

या प्रकरणावर आता स्वत: भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी प्रतिक्रिया देत या प्रकरणात योग्य ती कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. यावेळी बावनकुळे म्हणाले की, या अपघातातील गाडी माझ्या मुलाच्या नावावर आहे. पोलिसांनी या प्रकरणाची संपूर्ण चौकशी करावी. पोलिसांनी या प्रकरणी कोणालाही वेगळा न्याय देता कामा नये. किंबहुना, जे जे दोषी असतील त्यांच्यावर कारवाई करावी. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज तपासले पाहिजे. या प्रकरणाची पोलिसांनी सखोल चौकशी करावी. तसेच याबद्दल मी कुठल्याही पोलिस अधिकाऱ्यांशी आतापर्यंत बोललेलो नसल्याचे चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले.

### बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.१० सप्टेंबर २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : १.५० क्विंटल | २,६१० | २,९०० | २,७५५ |
| ज्वारी/हायब्रिड :१२८.०० क्विंटल | २,१२८ | २,७११ | २,२६१ |
| मूग : ४८.५० क्विंटल | ६,१०१ | ८,००० | ७,२४७ |
| तूर : ०.५० क्विंटल | ५,००१ | ५,००१ | ५,००१ |
| उडीद : १४०.०० क्विंटल | ४,६०१ | ७,१८० | ६,१८१ |
| बाजरी: २७.५० क्विंटल | २,४०१ | २,७५० | २,५५६ |
| चिंच/लोकल: २०.०० क्विंटल | १,१०० | ३,५५० | २,३२५ |
| सोयाबीन: १९४.५० क्विंटल | ४,५५० | ४,६२५ | ४,५७७ |
| हरभरा: १.५० क्विंटल | ६,१०० | ६,७५० | ६,४२५ |

## कॉम्रेड सीताराम येचुरी रूग्णालयात

**नवी दिल्ली। वृतसंस्था**

कॉम्रेड सीताराम येचुरी यांना श्वसनाच्या आजारामुळे दिल्लीतील एम्स रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे. येचुरी यांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया मार्क्सवादी पक्षाच्यावतीने प्रसिध्दी पत्रकान्वये देण्यात आली. कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया (मार्क्सवादी) सरचिटणीस सीताराम येचुरी, यांना गेल्या महिन्यात दिल्लीतील ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस (एम्स) मध्ये

पान २ वर

## कुर्ल्यातील शासकीय कर्मचाऱ्यांना बेघर करणारी नोटीस

### अदानीसाठी भाजपा-शिंदे सरकारचे तुघलकी फर्मान, वर्षा गायकवाड यांचा आरोप

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील भाजपा युती सरकारला जनाची नाही आणि मनाचीही नाही. दोन गुजराती मालकांच्या आदेशाने काम करणारे युती सरकार मुंबईकरांच्या जीवावर उठले आहे. मुंबई अदानीला विकूनच शिंदे-फडणवीसांचा आत्मा शांत होईल असे दिसत आहे. कुर्लाच्या मदर डेअरी कर्मचारी वसाहतीतील कुटुंबांना पर्यायी व्यवस्था न देताच १५ दिवसात घरे खाली करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. अदानीच्या स्वार्थासाठी शासकीय कर्मचाऱ्यांना बेघर करणारे हे तुघलकी फर्मान असल्याचा घणाघाती हल्ला मुंबई काँग्रेसच्या अध्यक्ष खासदार वर्षा गायकवाड यांनी केला.

यासंदर्भात प्रतिक्रिया देताना खासदार वर्षा गायकवाड

पान २ वर

# दोन दिवसात मराठवाडा, विदर्भात तुरळक पावसाचा अंदाज



**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्यातील काही भागात मध्यम ते जोरदार पाऊस हजेरी लावत आहे. तर अनेक ठिकाणी दुपारी उन्हाचा चटकाही जाणवत आहे. हवामान विभागाने राज्यातील अनेक भागात पावसाचा अंदाज दिला. तर गुरुवारपासून पावसाची उघडीप राहील, अशी शक्यता व्यक्त केली.**

हवामान विभागाने मंगळवारी हवामानाचा अंदाज व्यक्त केला. विदर्भातील भंडारा आणि गोंदीया जिल्ह्यात काही ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार पावसाचा रेड अलर्ट देण्यात आला. तर नागपूर जिल्ह्याला काही ठिकाणी जोरदार ते अतिजोरदार पावसाचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. मराठवाड्यातील सर्वच जिल्ह्यांमध्ये काही ठिकाणी जोरदार पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला. तर खानदेशसह नाशिक, पुणे, सातारा आणि कोल्हापूर जिल्ह्यात तसेच कोकणातील रत्नागिरी आणि रायगड जिल्ह्यातही काही ठिकाणी जोरदार पावसाचा येलो अलर्ट देण्यात आला आहे. गुरुवारी मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली आणि नांदेड जिल्ह्यात काही ठिकाणी हलक्या ते मध्यम पावसाचा अंदाज देण्यात आला आहे. तर राज्यातील इतर भागात पावसाची उघडीप राहील, असा अंदाज हवामान विभागाने दिला. शुक्रवारी आणि शनिवारीही राज्यात पावसाची उघडीप राहू शकते. मात्र स्थानिक वातावरणामुळे काही ठिकाणी पाऊस पडू शकतो, असा अंदाज हवामान विभागाने दिला.

अग्रलेख

# महाराष्ट्राचे राजकारण पहिल्यांदाच रसातळाला

महाराष्टातील सत्ताधारी तीन पक्षांमध्ये सुरू असणारी सत्ता स्पर्धा आणि एकमेकांवर कुरघोड्या करण्याचे राजकारण याची दखल देशातील दुसरे सर्वोच्च नेते गृहमंत्री अमित शहा यांना घ्यावी लागली आहे. शहा यांनी आपल्या मुंबई दौऱ्यात तिन्ही पक्षांच्या नेत्यांना कानपिचक्या देऊन तुमची भांडणे तुम्हाला महागात पडतील असे सुनावले आहे. यानंतर तरी परिस्थिती सुधारावी अशी अपेक्षा असली तरी एकमेकाला पाण्यात बघणारे हे नेते वरिष्ठांची पाठ फिरताच पुन्हा आपल्या पद्धतीने आपल्या स्पर्धकाचा काटा काढायला मागे पुढे पाहणार नाहीत.

दुसरीकडे पर्धेची दखल घेत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी महाराष्ट्राची सत्ता मिळाली तर संपूर्ण देशाची सत्ता मिळेल असे वक्तव्य केले आहे. राहुल गांधी आणि प्रियांका गांधी यांच्या २५ सभांचे नियोजन महाराष्ट्रात करण्यात आले आहे. याशिवाय जेथून निमंत्रण येईल तेथे आपण सभेला जाऊ अशी घोषणा राहुल गांधी यांनी केली आहे. शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी निवडणुकीच्या आधीपासून जाळे टाकण्यास सुरुवात केली आहे तर ज्येष्ठ नेते शरद पवार महायुतीतील नाराज मंडळींना आपल्या पक्षात घेण्यासाठी सज्ञ झाले आहेत. कागलच्या समीरजीत घाडगे यांच्यानंतर हर्षवर्धन पाटील त्यांच्या हाताला लागतील अशी चिन्हे आहेत. शिवाय पश्चिम महाराष्ट्रात फार मोठ्या प्रमाणावर ते धमाके फोडतील अशी स्थिती आहे. खुद्द भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी किमान पाच लोक पवारांच्या पक्षात प्रवेश करतील असे म्हटले आहे. सत्ता असताना अशी स्थिती निर्माण झालेली पाहणे आणि ती प्रदेशाध्यक्षांनी मान्य करणे याला अगतिकता म्हणतात.

राज्यातील सत्तेचा सर्वात मोठा दावेदार असणारा भाजप सध्या नेतृत्वाच्या गर्तेत सापडला आहे. सामूहिक नेतृत्व थोपवले जाण्याची शक्यता निर्माण झालेली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे वाढते प्रस्थ आणि उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्याविषयीची नाराजी, त्यात विद्यमान आमदारांना निवडणूक सर्वेचा दाखला देऊन असंरक्षीत केले जाण्याचे प्रयत्न अनेक ठिकाणी दिसून येऊ लागल्याने राज्यातील अनेक मतदारसंघात अस्वस्थता निर्माण झाली आहे. या अस्वस्थतेपोटी संघर्ष तीव्र होण्याची लक्षणे आहेत. आपले कोण आणि परके कोण याकडे न पाहता आपल्याला आडवा येणाऱ्या प्रत्येकाची जिरवणे हा यापुढे महाराष्ट्रातील नेत्यांचा मुख्य कार्यक्रम ठरेल अशी स्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे महाराष्ट्रातील विधानसभेच्या निवडणुका यंदा बिहार आणि उत्तर प्रदेशच्या दिशेने जाऊ लागतील की काय? अशा शंकेचे वातावरण निर्माण होत आहे. नेत्यांचे परस्परांतील वाढलेले संघर्ष, एकमेकांचे पाय खेचण्यासाठी सुरू असणाऱ्या खेळ्या आणि सत्ता टिकवण्याच्या दबावपोटी घेतले जात असणारे निर्णय या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील नेत्यांमध्ये जी जुंपलेली आहे, ती परिस्थिती पाहता या निवडणुका सहजासहजी होतील अशी लक्षणे दिसत नाहीत. सर्वसामान्य माणसांनी यातून काय धडा घ्यायचा हा प्रश्न निर्माण होतो. दुसरीकडे पोलीस यंत्रणा आहे, ज्यांना ही परिस्थिती हाताळायची आहे, त्या यंत्रणेच्या हतबलतेचे दर्शन प्रत्येक घटनेमध्ये होत आहे. मालवणमध्ये जेव्हा युती आणि आघाडीचे नेते समोरासमोर आले तेव्हा पोलिसांना नेमके करायचे काय? असा प्रश्न पडला. ती स्थिती राज्यभर सर्वत्र दिसत आहे. पूर्वी अधिकाऱ्यांच्या समोर दोन नेत्यांचे शाब्दिक मतभेद जरी झाले तरी त्याला फार गांभीर्याने घेतले जायचे. त्यात युती आणि आघाडीमधील परस्पर वाद ही आणखी एक वेगळीच बाब. यातून विद्यमान सरकारमधील मंत्र्यांची आणि आमदारांची जुंपलेली पाहायला मिळत आहे. राज्याच्या सत्तेवर मांड ठोकण्यासाठी प्रत्येकजण सिद्ध झाला आहे. प्रत्येकाने त्यासाठी आपापली यंत्रणा कामी आणली आहे. सत्तेचे अंतिम ध्येय जर लोकांचे हित असेल तर त्या हितासाठी सत्ता मिळवणारे नेते परस्परात असे भांडले नसते. त्यांचे भांडण नळावरच्या भांडणाच्याही खालच्या पातळीवर चालले आहे. त्यातून आता करमणूक देखील होत नाही. अशा स्थितीत आपले अधिक अवमूल्यन करून घेण्याच्या नादात या नेत्यांनी झाकली मूठ कायम राखावी महाराष्ट्राच्या जनतेवर आपला फैसला सोडावा असे म्हणणेही धाडसाचे ठरत आहे. त्यामुळे आता यांना आवरा असे या पक्षांच्या राष्ट्रीय नेत्यांना पुन्हा पुन्हा सांगावे लागेल आणि नेत्यांनाही पुन्हा पुन्हा कानपिचक्या द्याव्या लागतील हेच खरे.

# एएससी कंपनीकडून गोरगरीब लोकांचे पैसे परत मिळवण्यासाठी सायबर विभागाने कठोर कारवाई करावी

## अन्यथा सायबर विभागाच्या अधिकाऱ्यांची गृहमंत्र्यांकडे तक्रार करणार-आ.सुरेश धस

**आष्टी । प्रतिनिधी**

**एएससी या कंपनीने ऑनलाइन व्यवसाय द्वारा मासे विक्री आणि इतर प्रकारचे व्यवसाय अधिक पैसे मिळवण्याचे आमिष दाखवून गोरगरीब, छोटे-छोटे व्यवसायिकांना लुटले असून या व्यवसायिकांचे पैसे परत मिळवून देण्यासाठी बीड जिल्हा सायबर क्राईम सेलचे अधिकाऱ्यांनी अधिक कार्यक्षमतेने आणि कठोरपणे कारवाई करण्याची आवश्यकता आहे..अशी जनतेची अपेक्षा असून. त्यानुसार जिल्हा पोलीस दलातील सायबर विभागाच्या अधिकाऱ्यांनी तात्काळ कार्यवाही करावी अन्यथा या संबंधित अधिकाऱ्यांची तक्रार आपण उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे करणार आहोत असा इशारा माजी राज्यमंत्री सुरेश धस यांनी दिला.**



आष्टी पोलीस स्टेशन मध्ये पत्रकारांशी ते बोलत होते..ते पुढे म्हणाले, एएससी या ऑनलाईन कंपनीद्वारे छोट्या व्यवसायिकांना मासे विक्री व्यवसायातून अधिक नफा मिळवण्यासाठी ऑनलाईन पैसे गुंतवण्याचे आमिष दाखवण्यात आले.. त्यामध्ये तालुक्यातील १२०० ते १४०० लोकांचे प्रत्येकी ५ ते १० लाख रुपयापर्यंतची गुंतवणूक झाली असून आता त्यांची मोठ्या प्रमाणावर फसवणूक झाली आहे.त्यातील अनेक व्यवसायिकांनी व्याजाने पैसे काढून गुंतवणूक केल्यामुळे आज त्यांच्यावर फाशी घेण्याची वेळ आलेली आहे..त्यामुळे सायबर क्राईम विभागाकडे काळे नावाच्या व्यक्तीने याबाबत रितसर फिर्याद दाखल केली असून त्या फिर्यादीनुसार संबंधितांवर तात्काळ गुन्हे दाखल करून कठोर कारवाई करण्यात यावी.. आणि या गोरगरीब व्यवसायिकांचे पैसे मिळवण्यासाठी बीड जिल्हा पोलीस दलातील सायबर क्राईम विभागाच्या अधिकाऱ्यांनी अधिक कार्यक्षमते आणि प्रामाणिकपणे काम करण्याची आवश्यकता आहे असे सांगत ते म्हणाले की, बीड जिल्ह्यातील महादेव ॲप या महा घोटाळ्यातील नऊ नऊ अब्ज रुपये ज्या व्यक्तींच्या नावावर आर्थिक व्यवहार झालेला आहे त्या व्यक्तींपैकी अनेक जण उजळ माथ्याने फिरत आहेत.त्यांच्यावर सायबर विभागाच्या अधिकाऱ्यांची मेहरबानी दिसून येत आहे. सायबर विभागातील एक अधिकारी अनेक दिवसांपासून त्या ठिकाणी कार्यरत असून त्याची माहिती मी घेत आहे . या गोरगरीब जनतेची फसवणूक करणाऱ्या व्यक्तींचा शोध होऊन त्यांना त्यांचे पैसे परत मिळवण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करण्यात यावेत अन्यथा.. या सायबर विभागातील अधिकाऱ्यांची आपण राज्याच्या गृहमंत्र्याकडे तक्रार करणार आहोत असेही त्यांनी शेवटी सांगितले.

# शांततेचं आवाहन करत दिंद्रुड पोलिसांचा रूट मार्च




**दिंद्रुड । प्रतिनिधी**

दिंद्रुड शहरांमध्ये पोलिसांनी रूट मार्च काढत होऊ घातलेले गणेश उत्सव, ईद ए मिलाद हे सण शांततेत व आनंदाने साजरे करावे असे आवाहन केले. सध्या गणेश उत्सव सुरू असून ईद-ए-मिलाद हा सण देखील येत आहे हे दोन्ही सण शांततेत व आनंदाने साजरे करण्याचे आवाहन दिंद्रूड पोलीस बांधवांनी रूट मार्च करून केले आहे. पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ, अप्पर पोलीस अधीक्षक श्रीमती चेतना तिडके, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ धीरज कुमार यांच्या सूचनेप्रमाणे गावातील मार्केट रोड ते जुने बस स्थानक असा रूट मार्च काढण्यात आला. गणेश उत्सव व ईद-ए-मिलाच्या पार्श्वभूमीवर दिंद्रुड पोलीस प्रशासन सज्ज असून सर्वांनी उत्सव शांततेत साजरा करावा कोणत्याही प्रकारचे नियम भंग करू नये. नियम भंग करणारे व कायदा मोडणाऱ्या वर कठोर कारवाई केली जाईल असे सहायक पोलीस निरीक्षक अण्णाराव खोडेवाड यांनी सांगितले.

# भाऊसाहेब घुगे यांच्या हस्ते विविध विकासकामाचे भूमिपूजन

**जालना । प्रतिनिधी**

नजीक पांगरी येथील विविध विकासकामांचे भूमिपूजन शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांच्या हस्ते करण्यात आली . बदनापूर तालुक्यातील नजीक पांगरी येथे महाराष्ट्र राज्याचे रोजगार हमी योजना मंत्री संदिपान भुमरे व महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री अर्जुनराव खोतकर यांच्या वतीने व शिवसेनेचे जालना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांच्या विशेष प्रयत्नातून मंजूर करण्यात आलेल्या नजीक पांगरी येथील महादेवाचे मंदिर परिसर ,दर्गा परिसर ,व विद्यालय परिसरामध्ये तीस लाख रुपयांच्या पेव्हर ब्लॉक बसविण्याच्या कामाचे भूमिपूजन शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांच्या हस्ते करण्यात आले या कार्यक्रमाला शिवसेनेचे तालुकाप्रमुख कल्याणराव अवघड ,शिवसेना तालुका संघटक भगवानराव मदन, ज्येष्ठ शिवसैनिक राजेंद्र चौधरी, विधानसभा संघटक कैलास दुधाने ,शहर प्रमुख अंबादास कळसकर



,शहर संघटक अमोल दाभाडे, युवा सेना शहर प्रमुख कैलास खैरे ,नजीक पांगरी चे सरपंच संजय वाळके, विविध कार्यकारी सेवा सोसायटीचे चेअरमन कमलाकर पवार, माजी सरपंच सुभाष वाघ, नानासाहेब विद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष पांडुरंग पाटील वाघ, श्रीराम पाटील सेवानिवृत्त पीएसआय, भानुदास कराड सेवानिवृत्त सैनिक ,नादर सिंग का करवाल एडवोकेट ,रामकिसन पाटील पुंगळे वाघ सुरज पवार रामू तराळ रामभाऊ राऊत पांडुरंग वाघ दादाराव वाळके शेख दिलावर उद्धव राऊत रायभान काजळे बद्री मामा वाघ पी एन वाळके पाटील रामेश्वर दराडे सीए अमोल अग्रवाल प्रल्हाद मुळक विलास तुपे संतोष ताठे वाघ सर मोहिते सर गीते सर बाळाभाऊ वाघ यांच्यासह परिसरातील नागरिकांची उपस्थिती होती.

# महात्मा ज्योतिराव फुले प्रोत्साहन योजनेस १८ सप्टेंबर पर्यंत मुदत

**जालना । प्रतिनिधी**

महात्मा जोतीराव फुले शेतकरी कर्जमुक्ती योजने अंतर्गत प्रोसाहन लाभाची घोषणा शासनाने केली होती. नियमित कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना रु.५० हजार लाभ देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. जिल्हयातील १६८२२ शेतकऱ्यांना प्रोत्साहन निधी मिळालेला आहे. मात्र अनेक कारणांनी आधार प्रमाणिकरण न झाल्याने ६६६ लाभार्थी शेतकरी अजुनही निधीच्या प्रतिक्षेत असल्यामुळे सदर योजनेस पात्र ठरलेल्या परंतु आधार प्रमाणिकरण न झालेल्या शेतकऱ्यांसाठी महाआयटी यांनी दि.१२-०८-२०२४ ते ०७-०९-२०२४ पर्यंत आधार प्रमाणिकरणाची सुविधा उपलब्ध करुन दिली होती. सदर कालावधीत एकुण २३६ लाभार्थी शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण केलेले असून अद्यापही ४३० लाभार्थी शेतकऱ्यांनी आधार प्रमाणिकरण केलेले नाही. सदर ४३० लाभार्थी शेतक-यांपैकी जवळपास १५० शेतकरी मयत असून अद्यापही २८० शेतकऱ्यांनी त्यांचे आधार प्रमाणिकरण (-) केलेले नाही. सदर शेतकऱ्यांसाठी आधार प्रमाणिकरणाची सुविया दिनांक १८.०९.२०२४ पर्यंत वाढविण्यात आलेली आहे. अशी माहिती जिल्हा उपनिबंधक परमेश्वर वरखडे यांनी केली आहे -२०१९ योजनेचा लाभ घेण्यासाठी योजनेस पात्र असलेल्या संबंधीत शेतकऱ्यांनी त्यांचे आधार प्रमाणिकरण करणे अत्यावश्यक व बंधनकारक असुन आधार प्रमाणिकरण करण्यासाठी ही अंतिम संधी आहे.

सदर यादीतील जे लाभार्थी मयत आहेत त्यांचे बारसांनी संबंधीत बैंक शाखेमध्ये / वि.का.संस्थेमध्ये संपर्कसाधून मृत्यु प्रमाणपत्र, वारस प्रमाणपत्र व आवश्यक ती कागदपत्रे जमा करुन मयतशेतकयांचे कर्जखात्यास वारसाची नोंद दिनांक २८.०९.२०२४ पर्यंत करून घ्यावी. तसेच आधार प्रमाणिकरण बाकी असलेल्या संबंधीत हयात शेतकऱ्यांनी सदर योजनेच्या लाभासाठी मुळ आधारकार्ड व बचत खात्याचे पासबुक घेऊन संबंधीत बँकेत, व आपले सरकार सेवा () केंद्रावर जाऊन तातडीने दि.१८.०९.२०२४ पुर्वी आधार प्रमाणिकरण करुन घेण्याचे आवाहन, परमेश्वर वरखडे, जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जालना यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी संबंधीत बँक शाखा, वि.का. संस्था कार्यालये तसेच तालुका उप/सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांचे कार्यालयाशी संपर्क साधावा. असेही आव्हान जिल्हा उपनिबंधक परमेश्वर वरखडे यांनी केले आहे

# ओंकारेश्वर महादेव प्राणप्रतिष्ठा सोहळा

**अंबड । प्रतिनिधी**

श्री. सदगुरू एकनाथानंद रामानंद सरस्वती (भोलेबाबा) सिद्धेश्वर पिंपळगांव, योगिराज कैलासनाथ महाराज चिंचोली यांच्या उपस्थितीत प्रतिष्ठान सोहळा पार पाडला. यावेळी तसेच आ. नारायण कुचे यांची उपस्थिती होती. तसेच अंबड शहरात शुभयात्रा काढण्यात आली होती ही शुभयात्रा श्रीकृष्ण नगर, ओंकारेश्वर महादेव मंदिर समारोप झाली.यानंतर कीर्तनाचा कार्यक्रम यावेळी झाला. ह.भ.प. भगवान महाराज आनंदगडकर यांचे कीर्तन




झाले यानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम संपन्न झाला

# आरोग्यसेवेसोबत गणेशोत्सव साजरा करणे म्हणजे परंपरा आणि मांगल्याचे दर्शन-पोकळे

**आष्टी । प्रतिनिधी**

आरोग्यसेवा करणे म्हणजेच श्रीगणेशाची सेवा होय,आरोग्यदुतांनी आपल्या दैनंदिन आरोग्य सेवा करत वेळात वेळ काढून गणेशोत्सव साजरा करणे म्हणजे भक्तीच्या वेगळ्या वाटा चोखाळत उत्सवाची परंपरा आणि मांगल्य कायम ठेवण्याच्या प्रयत्न करत संस्कृतीचे दर्शन घडवत सामाजिक बांधिलकी जोपासणे असल्याचे प्रतिपादन आष्टी तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रविण पोकळे यांनी केले आहे. आष्टी येथील ग्रामीण रुग्णालयात अधिकारी व कर्मचारी यांनी एकतंताय गणेश मंडळाच्यावतीने पाच दिवसांची श्री गणेशाची स्थापना करत मंगळवार (दि.१०) रोजी सकाळी ९.३० वा.आष्टी तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रविण पोकळे व पत्नी आरोग्यसेविका सौ.ज्योती प्रविण पोकळे सपत्नीक आरतीचा मान दिला. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी आष्टी ग्रामीण रूग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ.राहूल टेकाडे,डॉ.मस्तुद सर, संदीपान धस सर,सुधिर सोनवणे,वैभव येडे सर ,सरोदे सर,चंद्रकांत बोडखे,निकिता कोळी मॅडम,आकूजकर मावशी,वृषाली शिनगारे यांच्यासह आदि उपस्थित होते.

# रोटरी क्लबकडून मोफत कृत्रिम हातपाय वाटप



**अंबड । प्रतिनिधी**

रोटरी क्लबच्या वतीने ९ सप्टेंबर रोजी मोफत कृत्रिम हात, पाय,वाटप करण्यात आले या कार्यक्रमास उपस्थित अंबड तहसीलचे तहसीलदार ,डॉ.श्री भीमराव दोडके वैद्यकीय अधीक्षक उपजिल्हा रुग्णालय अंबड, श्री. रणवीर कोळपे आगर प्रमुख ,श्री. विनोद जेठे शाखा अधिकारी चिखली बँक , रोटरी क्लबचे डॉ. लक्ष्मण सावंत , डॉ. केशव मुरकुटे , राजकमल करवा अध्यक्ष रोटरी क्लब , विनोद कुलकर्णी, डॉ. रोहित भाला , पुरुषोत्तम सोमानी , डॉ. भरत होंडे , जगदीश चरका,डॉ. रमेश दुधाळ , डॉ. पाईकराव , गणेश बोबडे, संतोष शिनगारे,बालासाहेब हमने, संभाजी बारहाते ऋषी गिल्डा तसेच रोटरी क्लबचे सदस्य उपस्थित होते.

पान १वरून...

### शेतकऱ्यांना सानुग्रह

बच्चू कडू यांनी जिल्हाधिकारी यांना धारेवर धरत तातडीने पंचनामे न केल्यास जशास तसे उत्तर देवू असा सज्जड दम भरला. यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटना, स्वराज संघटना व प्रहार संघटनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

-----------

### मी शहीद

जीवन संपवू नका, असे आवाहन त्यांनी तरुणांना केले. तरुणांनी संयम ठेवावा. आरक्षणाचा प्रश्न सुटण्याचा विश्वास त्यांनी व्यक्त केला. मराठा आरक्षणासाठी मी मरायला तयार आहे, असे म्हटले. नेत्यांना मराठा आरक्षणाशी काही देणे-घेणे नसल्याचा आरोप त्यांनी यावेळी केला. त्यांना त्यांच्या पक्षाचा अजेंडा मोठा करायचा आहे. नेत्यांची धडपड निवडणुकीसाठी सुरू असल्याचा आरोप त्यांनी केला. यापूर्वी अंतरवाली सराटीत उपोषण सोडतानाच जरांगे पाटील यांनी सरकारला सप्टेंबरची मुदत दिली होती. तोपर्यंत आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावण्याचा आग्रह धरला होता. आता विधानसभा निवडणुकीपूर्वी पुन्हा त्यांनी उपोषणाचा निर्णय जाहीर केला आहे.

------

### अपघातातील गाडी चंद्रशेखर

बावनकुळे यांच्या मुलाचीच असल्याचा आरोप शिवसेना ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी केला आहे. नागपूरच्या रामदास पेठ येथे घडलेल्या 'हिट अँड रन'प्रकरणातील गाडीचा नंबर पोलिसांनी का नोंदवला नाही? माझा थेट आरोप आहे की, संकेत बावनकुळे हा चंद्रशेखर बावनकुळे यांचा मुलगा अपघातावेळी गाडीत होता. तर ही गाडी प्रताप कामगार यांच्या मालकीची असून गाडीचे मालकही ते आहेत. मात्र, अपघाताच्या वेळी पोलिसांनी गाडी नंबर नोंद करून कारवाई करणे अपेक्षित होते. मात्र, प्रत्यक्षात तसे झाले नाही. त्यामुळे या प्रकरणात वेगळा न्याय का दिला? गाडी आणि संबंधित लोकांना पोलिसांनी ताब्यात का घेतले नाही? एका नेत्याच्या मुलाला वेगळा न्याय आणि सर्वसामान्यांना वेगळा न्याय का? असा सवाल ठाकरे गटाच्या नेत्या सुषमा अंधारे यांनी उपस्थित केला आहे.

--------

### अजित पवारांचा फोटो काळ्या

बारामतीत पाहायला मिळाली. माजी नगरसेवक अभिजित काळे यांनी चौकात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या फोटोला दुग्धाभिषेक घालत या प्रकाराला प्रत्युत्तर दिले. यंदा शिवसेनेने बारामतीत एकनाथ गणेश फेस्टीव्हलचे आयोजन केले आहे. या फेस्टिव्हलमध्ये दहा दिवस विविध कार्यक्रम आयोजित केले आहेत. प्रेक्षकांना बसण्यासाठी भव्य वॉटरप्रूफ मंडप, खुर्च्या, कार्यक्रमासाठी स्टेज अशी व्यवस्था केली. या फेस्टिव्हलच्या उद्घाटनाला यावे, अशी विनंती जेवरे यांनी उपमुख्यमंत्री पवार यांच्याकडे केली होती. रविवारी (दि. ८) बारामतीत पवार यांनी विविध गणेश मंडळांना भेटी देत आरती केली. त्यांचे कुटुंबिय अन्य ठिकाणी हजर राहिले. परंतु या फेस्टिव्हलकडे ते आले नाहीत. त्या संतापातून जेवरे यांनी हे पाऊल उचलले. भिगवण चौकासह शहरात त्यांनी कमानी उभ्या केल्या आहेत. त्यावर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांची छायाचित्रे लावली आहेत. परंतु पवार यांनी महायुतीतील घटक पक्षाच्या कार्यक्रमाकडे पाठ फिरवल्याने हा प्रकार करण्यात आला. पोलिस निरीक्षक विलास नाळे यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली. जेवरे यांना ताब्यात घेण्यात आले. पोलिस निरीक्षक विलास नाळे म्हणाले, कमानी किंवा त्यावरील फोटोवरून वातावरण बिघडत असेल तर कारवाई केली जाईल. दुसरीकडे सुरेंद्र जेवरे यांनी यापूर्वी लोकसभा निवडणूकीत महायुतीच्या उमेदवार सुनेत्रा पवार यांचा जोरदार प्रचार केला होता. मुख्यमंत्री लाडकी बहिण योजना जाहीर झाल्यानंतर त्यांनी पक्षाच्या वतीने बारामतीत स्वतंत्र व्यवस्था करत सुमारे २२ हजारांहून अधिक महिलांचे अर्ज भरून घेतले होते. त्यांच्या या केंद्राला उपमुख्यमंत्री अजित पवार, महिला-बालकल्याण मंत्री आदिती तटकरे, खासदार सुनेत्रा पवार यांनी भेट दिली होती. रक्षाबंधनाला तर खा. सुनेत्रा पवार यांनी जेवरे यांच्या कामाचे कौतुक करत त्यांना राखी बांधली होती.

------------

### कुर्ल्यातील शासकीय कर्मचाऱ्यांना

म्हणाल्या की, पंतप्रधान मोदी यांचे परममित्र अदानीसाठी भाजपा युती सरकार कोणत्याही थराला जायला तयार आहे. ऐन गणपती उत्सवाच्या काळात कुर्ला येथील मदर डेअरीच्या कर्मचारी वसाहतीत राहणाऱ्या कुटुंबांना १५ दिवसांत घरे खाली करण्याचे फर्मान काढले आहे. ही कुटुंबे वर्षानुवर्षे या जागेत वास्तव्यास असून केवळ अदानीच्या स्वार्थासाठी या लोकांना विस्थापित केले जात आहे. अजूनतरी या कुटुंबांना कुठेही राहण्याची पर्यायी व्यवस्था दिलेली नाही असे असताना त्यांना घरे खाली करण्याचे आदेश देणे, हा सरकारचा किळसवाणा प्रकार आहे. हे सरकार आपल्या लाडक्या उद्योगपतीसाठी निर्लज्जपणे लोकांना बेघर करत असल्याचा आरोपही यावेळी केला. वर्षा गायकवाड पुढे बोलताना म्हणाल्या की, मदर डेअरीच्या जागेवर केवळ सार्वजनिक उद्यान उभारले जावे, यासाठी कुर्ल्यातील नागरिकांनी मोठी जनचळवळ उभारलेली आहे. तरी देखील मित्रासाठी काहीही करण्यास तत्पर असलेले भाजपा सरकार लोकांच्या आंदोलनाकडे जाणीवपूर्वक कानाडोळा करत आहे. जनतेचा आवाज दडपण्यासाठी दडपशाही मार्ग अवलंबत आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या शिवसेनेचे स्थानिक आमदार मंगेश कुडाळकर हे मदर डेअरीच्या जमीन हस्तांतरणाच्या आदेशाला मुख्यमंत्र्यांनी स्थगिती दिल्याचा खोटा दावा वारंवार करत आहेत. पण धारावी पुनर्वसनाच्या आडून संपूर्ण मुंबई अदानीला विकण्याचा मोदानी सरकारचा हेतू आहे हेच वास्तव आहे. मुंबईकर मात्र भाजपाच्या लुटारू सरकारचे मनसुबे कधीही यशस्वी होऊ देणार नाही, असा इशाराही यावेळी दिला.

------------

### कॉम्रेड सीताराम

दाखल करण्यात आले होते, त्यांना मागील महिन्यापासून श्वसनाचा त्रास होत होता, असे पक्षाने एका निवेदनात सांगितले आहे. त्याची प्रकृती चिंताजनक असून जीवनाश्वक सपोर्टवर त्यांना ठेवण्यात आले आहे. सीपीआय(एम) नेते सीताराम येचुरी यांच्यावर नुकतीच मोतीबिंदूची शस्त्रक्रिया करण्यात आली होती.

------

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
बुधवार दि. ११ सप्टेंबर २०२४




जालना : शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांच्या नाथ पर्व जालना निवासस्थानी गणरायाचे आरती करण्यात आले याप्रसंगी जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे सौ कल्पना घुगे, रमेश घुगे,सौ रुपम घुगे, दिलीप जायभाये, सौ शारदा जायभाये,इंजि. अजिंक्य घुगे,आदित्य घुगे, विहान गणेश घुगे रियांश अशोक घुगे, साचिका अशोक घुगे, इरा रमेश घुगे यांच्यासह कुटुंबियांची उपस्थीती होती.

# मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वतीने जाहीर केलेल्या योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवा - मंगेश चिवटे

अंबाजोगाई । प्रतिनिधी

महायुती सरकार व मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या वतीने जाहीर केलेल्या योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी सर्व पदाधिकारी व शिवसैनिकांनी प्रयत्न करून पुन्हा एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्री करण्यासाठी प्रयत्न करावे असे आवाहन मुख्यमंत्री वैद्यकीय मदत कक्षाचे प्रमुख मंगेश चिवटे यांनी केले





## अंबाजोगाई शहर मध्यवर्ती कार्यालय एकनाथ आश्रम व्हावे –ज्योतीताई वाघमारे

शिवसेनेच्या वतीने आयोजित कामगार व शिवसैनिकांच्या मेळाव्या प्रसंगी ते बोलत होते यावेळी व्यासपीठावर शिवसेना प्रवक्त्या ज्योती ताई वाघमारे, संपर्क प्रमुख विजय पाटील, युवासेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण,जिल्हाप्रमुख सचिन मुळूक,युवा व्याख्याते किरण कोरे, प्रदेश समन्वयक वैजनाथ वाघमारे, तालुकाप्रमुख अर्जुन वाघमारे यांची उपस्थिती होती

कार्यक्रमाच्या सुरुवातीला शहरप्रमुख ऋषिकेश लोमटे यांच्या शहर कार्यालय संपर्क कार्यालयाचे उद्धाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले,प्रस्ताविक करताना उपजिल्हाप्रमुख गजानन मुडेगावकर यांनी कामगारांच्या समोरच्या समस्या मांडुन त्या सोडविण्यासाठी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पर्यंत पाठपुरावा करणार असल्याचे सांगितले तर ऋषिकेश लोमटे यांनी हे कार्यालय जनतेच्या प्रश्नाची सोडवणूक करण्यासाठी सदैव तत्पर राहिन असे आश्वासन दिले.मंगेश चिवटे बोलताना म्हणाले की, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे संवेदनशील असुन लाडकी बहिण योजना देऊन महिलांना मोठा आधार दिला आहे यापुढे कामगारांच्या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.या मेळाव्याला मार्गदर्शन करताना ज्योती ताई वाघमारे म्हणाल्या जसे बाळासाहेब भवन,आनंद आश्रम मधुन जनतेचे प्रश्न सोडवले जातात तसे शहर मध्यवर्ती कार्यालय एकनाथ आश्रम व्हावे अशी अपेक्षा व्यक्त केली

यावेळी प्रसिद्ध व्याख्याते गणेश शिंदे,किरण कोरे , संपर्क प्रमुख विजय पाटील, जिल्हा प्रमुख सचीन मुळुक यांनी मनोगत व्यक्त केले.या मेळाव्याच्या निमित्ताने चौका चौकात लावलेले भगवे झेंडे व फलक यामुळे अंबाजोगाईत भगवेमय वातावरण झाले असून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मागील काही दिवसांपासून घेतलेले माझी बहिण लाडकी बहिण योजने सारखे निर्णय या मुळे शहरात शिवसेने कडे नविन तरुणांचा ओढा वाढला आहे आगामी काळातील निवडणुकीत नक्कीच याचा फायदा होईल अशी चर्चा शहरात होताना दिसत आहे.मेळावा यशस्वी करण्यासाठी दादासाहेब देशमुख, दत्ता आबा बोडके,रमेश टेकाळे,दत्ता नाना देवकर,खंडु पालकर,दशरथ चाटे,विजय जाधव, समाधान पिसाळ, धर्मराज मोरे, अवधूत कदम, उषाताई यादव,ॲड.सुनीता जोशी,सौरभ आडे,कामगार सेनेचे व कामगार संघटना, ॲटोयुनियनचे सर्व सदस्य यांनी परिश्रम घेतले. या मेळाव्याला कामगारांची प्रचंड मोठी उपस्थिती होती,शिवसेनेचा एवढा मोठा कार्यक्रम पहिल्यांदा झाला अशी चर्चा शहरात होत आहे.

## गुणगौरव पुरस्कार मिळाल्याबद्दल खा.काळे यांच्या हस्ते सत्कार



अंबड । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासनाचा क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले राज्य शिक्षक गुणगौरव पुरस्कार २०२४ श्री गोधाजी कापसे (सहशिक्षक) यांना प्रदान झाल्याबद्दल खासदार डॉ. श्री. कल्याण काळे यांनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन भेट दिली व पुरस्कार मिळाल्याबद्दल सपत्नीक सत्कार केला व शिक्षण क्षेत्रावर चर्चा केली, शिक्षण ही काळाची गरज आहे,जिल्हा परिषदेच्या शाळा ह्या गुणवत्ता पूर्ण शिक्षण देतात जिल्हा परिषदेचे शिक्षकही गुणवान आहेत परंतु बहुतांश ठिकाणी शालेय इमारत, क्रीडांगण, अशा भौतिक सुविधांचा अभाव दिसून येतो यामुळे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेवर परिणाम होतो. जिल्हा परिषदेच्या शाळेच्या भौतिक सुविधेवर कटाक्षाने लक्ष देणार व जिल्हा परिषदेच्या शाळांचा दर्जा कसा वाढेल यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्यांनी सांगितले व गोरगरिबांच्या प्रत्येक विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळाले पाहिजे ही तळमळीची भूमिका यावेळी खासदार श्री कल्याण काळे यांनी मांडली.यावेळी बबलू चौधरी, बप्पासाहेब गोल्डे, जाकीरभाई डावरगावकर, डॉ. राहुल बागुल, ॲड संजय काळबांडे, संदीपान जाधव ,जगन दुर्गे सर, गनीभाई सय्यद,सोमनाथ सवणे,शिवाजी धुपे सर,कल्याण सोळंखे,बाबुराव आरडे, बाळासाहेब जाधव,प्रशांत बागुल, आदी मान्यवरांची उपस्थिती होती.

## सतीश घाटगे यांच्या संकल्पनेतून वडीगोद्रीत साकारतेय भव्य बाजारपेठ

अंबड । प्रतिनिधी

भाजपा नेते तथा समृद्धी साखर कारखान्याचे चेअरमन सतीश घाटगे यांच्या प्रयत्नामुळे ४० वर्षापासून रखडलेल्या वडीगोद्री येथील मुख्य बाजार समितीच्या विकासाचा प्रश्न मार्गी लागलाआहे. सतीश घाटगे यांच्या संकल्पनेतून या ठिकाणी शेतकरी आणि व्यापाऱ्यांच्या विकासासाठी ६१ एकरावर भव्य मार्केट यार्ड विकसित होत आहे. या मार्केट यार्डमधील गाळ्यांचे वाटप शेतकरी व व्यापाऱ्यांना करण्यात येणार आहे. त्यासाठी गाळ्यांचा जाहीर लिलाव होणार असून इच्छुक शेतकरी व व्यापाऱ्यांनी यात सहभागी व्हावे,असे आवाहन सतीश घाटगे यांनी केले आहे.



४० वर्षांपासून वडीगोद्री येथील मुख्य बाजार समितीच्या विकासाचा प्रश्न प्रलंबित होता.चाळीस वर्षांत राष्ट्रवादीच्या नेत्यांना या बाजार समितीचा प्रश्न सोडवता आला नाही.शेवटी बाजार समितीत सत्ता बदल होताच सतीश घाटगे यांच्या नेतृत्वाखाली बाजार समितीचे सभापती ,उपसभापती अरुण घुगे व महायुतीचे पदाधिकारी यांनी शासनस्तरावर पाठपुरावा करून बाजार समितीच्या विकासाचा प्रश्न सोडवला. त्यानंतर शेतकरी व व्यापारी वर्गाच्या विकासासाठी आणि शेतकऱ्यांच्या शेतमालाला चांगला भाव आपल्या तालुक्यातच मिळावा याउद्देशाने वडीगोद्री येथे ६१ एकरावर भव्य कृषी उद्योग प्रकल्प साकार होत आहे.शेतकरी व व्यापाऱ्यांना या प्रकल्पातील व्यापारी गाळे पारदर्शी पद्धतीने जाहीर लिलावातून व्यवसायासाठी देण्यात येणार आहे.त्यासाठी लिलाव प्रक्रिया राबविण्यात येणार असून १५ सप्टेंबर पर्यंत इच्छुक शेतकरी व व्यापारी अर्ज करू शकतात.व्यवसायाच्या दृष्टीने ही संधी शेतकरी व व्यापारी वर्गासाठी महत्वाची असल्याने या लिलावात इच्छुक शेतकरी व व्यापारी यांनी सहभागी व्हावे,असे आवाहन सतीश घाटगे यांनी केले आहे.

**बाजारपेठेमुळे शेतकऱ्यांना चांगले दिवस येणार –**

चाळीस वर्षापासून वडीगोद्रीत मुख्य बाजारपेठ सुरु होण्याची वाट शेतकरी पाहत होते.शेतकऱ्यांनी आमच्यावर विश्वास टाकून बाजार समितीची सत्ता भाजप –सेनेच्या हातात दिली.सत्तेवर आल्यावर पहिला प्रयत्न शेतकऱ्यांचे स्वप्न पूर्ण करण्याचा असून ६१ एकरावर भव्य कृषी उद्योग प्रकल्प शेतकरी आणि व्यापाऱ्यासाठी खुला होणार आहे.या प्रकल्पातील गाळे हे पारदर्शी पद्धतीने वाटप होणार आहे अशी माहिती

सतीश घाटगे पाटील, भाजप नेते, तथा चेअरमन समृद्धी शुगर्स लि यांनी दिली आहे.

## पत्रकारांच्या हस्ते खडकत चौक गणेश मंडळाची आरती संपन्न

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

राजे संभाजी मित्र मंडळ व अमोल राजे मित्र मंडळ यांच्या विद्यमाने आयोजित खडकत चौक गणेश मित्र मंडळाच्या गणरायाचे आरतीचे आयोजन पत्रकारांच्या हस्ते करण्यात आले होते यावेळी सर्व पत्रकार यांच्या उपस्थितीत श्रीगणेशाची आरती करण्यात आली. यावेळी जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे, सरपंच परिषदेचे राज्य अध्यक्ष दत्ता काकडे, युवा पत्रकार संघाचे अध्यक्ष अविनाश कदम, अविशांत कुमकर, प्रवीण पोकळे, गणेश दळवी, राजे संभाजी उद्योग समूहाचे अध्यक्ष अमोल राजे शिंदे यांच्या हस्ते आरती करण्यात आली यावेळी पत्रकार राजेंद्र लाड, शेख निसार,



जावेद पठाण, अक्षय विधाते, संतोष नागरगोजे, आण्णासाहेब साबळे, शेख समीर यांच्यासह, खडकत चौक गणेश मित्र मंडळाचे सतीश जगदाळे चेअरमन, बिबीशन भवर सरपंच कृष्णा तवले अध्यक्ष, राहुल सोले उपाध्यक्ष अक्षय सुपेकर सचिव, विनायक पन्हाळकर, रामदास खिळे, प्रकाश शिंदे, परमेश्वर शेवाळे, सलीम पठाण, गौरव केरूळकर, ओंकार केरूळकर, निहाल पठाण, शाहरुख पठाण, जालिंदर कुमकर, सागर खोसे रितेश बोराडे, रोहित वांढरे, मोहन पन्हाळकर लक्ष्मण पांडुळे आदी उपस्थित होते.

## सेवानिवृत्त प्रभाकर रूपसिंग राठोड यांचा सेवा गौरव सोहळ्यात सत्कार

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

छत्रपती संभाजीनगर येथे प्रथमच शासकीय सेवेतून, नोकरीतून निवृत्त झालेल्या सर्व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा गौरव दत्ताभाऊ राठोड मित्र मंडळ छत्रपती संभाजीनगर यांच्यामार्फत आयोजित करण्यात आला.




या सेवा गौरव सोहळयामध्ये अनेक कर्मचारी ज्यांनी शासनाची तथा समाजाची सेवा केली त्यांचा गौरव करण्यात आला. बीड येथील प्रभाकर रूपसिंग राठोड,सेवानिवृत्त उपमुख्याध्यापक, भगवान विद्यालय, बीड यांच्या कार्याचा गौरव या कार्यक्रमात करण्यात आला.

सदर सेवा गौरव सोहळ्याचे प्रमुख पाहुणे डॉ. विनय कुमार राठोड () पोलीस अधीक्षक ग्रामीण, छत्रपती संभाजीनगर यांच्या हस्ते सर्व सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सन्मानचिन्ह तथा प्रमाणपत्र देण्यात आले. प्रसंगी कार्यक्रमाचे उत्कृष्ट आयोजन करणारे मा. दत्ताभाऊ राठोड, समाज हितचिंतक यांच्यासह सेवानिवृत्त प्राध्यापक बी यु राठोड, अनिता राठोड, ग ह राठोड, मदनसिंग राठोड, प्रभाकर राठोड यांच्या पत्नी पारूबाई राठोड, सुधाकर राठोड, अमित पवार व इतर मान्यवर उपस्थित होते.

## अंबाजोगाईच्या स्थानिक एकाधिकार शाहीला झुगारून कुलस्वामिनी मित्र मंडळाच्या अनेक युवकांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई तालुका व शहरातील एकाधिकार शाहीला झुगारत प्रभाग क्रमांक १ व प्रभाग क्रमांक ९ येथील भाजपच्या अनेक आजी माजी पदाधिकारी, तरुण युवकांनी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच पालकमंत्री ना धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वावर विश्वास दाखवत त्याचबरोबर राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष

राजकिशोर मोदी यांच्या कार्यकुशलतेवर विश्वास ठेवत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजितदादा पवार यांचे त्याचबरोबर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे कृषिमंत्री ना. धनंजय मुंडे यांचे हात बळकट करून पक्षाचे विचार जनसामान्यांपर्यंत पोचविण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे नव्यानेच राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केलेल्या कार्यकर्त्यांनी यांनी सांगितले. यावेळी व्यासपीठावर राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष राजकिशोर मोदी, माजी उपनगराध्यक्ष मनोज लखेरा, खालेद चाऊस,महादेव आदमाणे,दिनेश भराडीया ,संकेत मोदी, माणिकभाऊ कदम, जनार्धन राऊत, गणपतराव वाघमारे, किसनराव जाधव, अमृत काळे यांची उपस्थिती होती.

आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केलेल्या मध्ये कुलस्वामिनी मित्र मंडळाचे सुशिलकुमार वाघमारे, हुसेन चौधरी , सुनिल साठे, संजय शिंदे, किशोर गोरे, हरिराम जगताप , राहुल कदम , प्रशांत वाध, सुरेश टेकाळे, अंबादास गाढवे, विवेक केंद्रे, सुधीर सुरवसे, नवनाथ काळे, गोरख काळे, उमेश सुरवसे, दिनेश सुरवसे, मुकेश सुरवसे, परमेश्वर माने,योगीराज सुरवसे, शेख इम्रान, शेख करीम शेख मुन्ना,गोटू उपाध्याय, आदित्य लोढा, राघव उपाध्याय, ऋषिकेश गवळी, अभिनव उपाध्याय, विशाल फुलारी, आकाश फुलारी,शिवसंदेश राऊत, नामदेव माने, श्रीकांत काळे यांचा समावेश आहे. यावेळी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्यामुळे श्रीमती कावेरी मारोतीराव राऊत यांचा शाल व पुष्पगुच्छ



देऊन सन्मान करण्यात आला.

या प्रवेश सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ सहकारी माणिक भाऊ कदम हे होते. नव्यानेच पक्षप्रवेश केलेले हुसेन गवळी यांनी राजकिशोर मोदी हे गेली कित्येक वर्ष अंबाजोगाई शहरात अतिशय चांगले काम करत आहेत आणि त्यामुळे चांगले काम करणाऱ्या सोबत आपण रहावे व त्यांना साथ द्यावी या उद्देशाने आपण आपल्या सर्व सहकाऱ्यांसोबत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करत असल्याचे हुसेन गवळी यांनी सांगितले. यावेळी माजी नगरसेवक महादेव आदमाने यांनी देखील आपले मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले की मागील काही दिवसपासून अंबाजोगाई शहरात युवकांना व इतर पक्षातील कार्यकर्त्यांना विविध प्रकारचे आमिष तथा प्रलोभने देऊन फोडाफोडीचे राजकारण जोमात चालू आहे.याचा प्रत्यय वैयक्तिक मला स्वतःला देखील आला असून मलाही बाजूला घेण्याचा प्रयत्न केला गेला पण ते त्यात असफल राहिल्याचे आदमाणे यांनी याप्रसंगी नमूद केले. अंबाजोगाई शहर व परिसराचा राजकीय, सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक विकास राजकिशोर मोदी यांनीच केला. पक्षात नवीन प्रवेश केलेल्या सर्व युवकांचे महादेव आदमाने यांनी अभिनंदन करत त्यांचे स्वागत केले.

या कार्यक्रमात राजकिशोर मोदी यांनी मार्गदर्शन करतांना कुलस्वामिनी मित्र मंडळाच्या सर्व सदस्यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश दिल्याचे सांगताना माझ्या राजकीय जीवनाची सुरुवात ज्या ठिकाणाहून झाली त्याच ठिकानी व त्याच जेष्ठ मार्गदर्शकांच्या उपस्थिती मध्ये या युवकांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष प्रवेश सोहळा होत असल्याने अतिशय अभिमानाने सांगितले. ज्या लोकांनी मला माझ्या राजकिय जीवनापासून साथ दिली तेच सहकारी आजही माझ्या सोबत राहून माझ्यावर तेवढेच प्रेम करतात हे सांगताना राजकिशोर मोदी यांचा कंठ दाटून आला होता. आपण आजपर्यंत कुठलीही जात धर्म न पाहता सर्वांना सोबत घेऊन काम केल्याची कबुली यावेळी मोदी यांनी दिली. या कार्यक्रमात राज्याचे माजी मुख्यमंत्री स्व. विलासराव देशमुख, माजी आमदार स्व.बाबुरावजी आडसकर, स्व.विजयकुमारजी जाजू तसेच स्व. भगवानराव लोमटे यांची आठवण काढत त्यांच्यासोबत काम करण्याची संधी मिळाल्याचे सांगितले. आपल्या राजकीय जीवनात नेहमीच गुरुवार पेठ परिसराला झुकते माप देऊन तेथील विकास साधला आहे. येथील नागरिकांनी केलेल्या सहकार्यातून थोड्याफार प्रमाणात उतराई होण्याचा प्रामाणिक प्रयत्न करत असल्याचे राजकिशोर मोदी यांनी सांगत यापुढे येथील नागरिक व युवकांना कसल्याही प्रकारची अडचण येऊ देणार नसल्याचे अभिवचन याप्रसंगी मोदी यांनी दिले. तरुणांनी निर्व्यसनी राहून आपल्या कुटुंबासोबतच आपल्या समाजाचा विकास करण्याचे आवाहन यावेळी राजकिशोर मोदी यांनी केले. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केलेल्या कुलस्वामिनी मित्र मंडळ गुरुवार पेठ येथील सर्व पदाधिकारी व युवकांचे पक्षात स्वागत करून त्यांना शुभेच्छा दिल्या. तसेच यापुढे त्यांना सर्वोतोपरी सहकार्य करणार असल्याचे युवकांना सांगितले.

पान ६ वरून...

### आठवडी बाजारात

माजलगाव ग्रामीण पोलिसांना पाचारण करण्यात आले.नागरिकांनी ताब्यात घेतलेल्या तरुणाला पोलिसांच्या स्वाधीन केले. दरम्यान गणेश बद्रीनाथ आवटे यांच्या फिर्यादीवरून मोबाईल चोर सुंदर बापू गुंजाळ, (वय ४५) कृष्णा उर्फ गुड्ड्या पांडुरंग गायकवाड (वय २०) व इत्तर एक राहणार गांधी नगर बीड.यांच्या विरोधात माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### अंधारे मॅडम धरणं भरले

जनतेला पाणी दिले पाहिजे. एकीकडे रोख कर घेतात परंतु त्या मोबदल्यात जबाबदारी असूनही पाणी मिळत नाही. अनेक कारणे सांगून नागरिकांचे तोंड बंद करतात. ही कारणे ऐकून नागरिकांचे कान बधीर झाले आहेत. त्यांच्या सहनशिलतेचा अंत न पाहता जनतेच्या पिण्याच्या पाण्याची सोय करावी. असे आवाहन भाजपा नेते तथा माजी न.प. सभापती नवनाथ शिराळे पाटील यांनी केले आहे.

### मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या

अविनाश सिंटे, नायब तहसीलदार माधव काळे आणि संबधित विभागाचे अधिकारी व प्रतिनिधी उपस्थित होते. या बैठकीत निवासी उपजिल्हाधिकारी यांनी १७ सप्टेंबर मराठवाडा मुक्ती संग्राम ध्वजारोहणाच्या कार्यक्रमासंबधी सर्व संबधित विभागास कार्यक्रमाच्या पुर्वतयारीसाठी सूचना दिल्या तसेच दि. १६ सप्टेंबर व १७ सप्टेंबर रोजी रात्री कार्यक्रमास्थळी रोषनाई करण्यात यावी, अशा सूचनाही निवासी उपजिल्हाधिकारी यांनी यावेळी संबधित यंत्रणेस दिल्या.

### विमुक्त जातीतील बोगस राजपूत

दिवशी माझ्या कडून चुकीची घोषणा झाल्याचे सांगत एस.आय.टी.लागू करणार नसल्याचे सांगितले. तेव्हा गोरसेनेच्या वतीने नागपूर हिवाळी अधिवेशनावर नागपुरात ०८ डिसेंबर रोजी २५ –३० हजार लोकांच्या जनसमुदायाला घेऊन जन आक्रोश महामोर्चा काढण्यात आले मात्र या मोर्चाचे साधे निवेदन घेण्यासाठी सुद्धा राज्य सरकारच्या एकही मंत्र्याने औचित्य दाखविले नाही. मंत्री अतुल सावे विधीमंडळातून पळ काढला अन्? मोर्चेकरीच्या नेतृत्वाला सामोरे गेले नाही. साधे निवेदन न घेतल्याने समस्त गोरबंजारा समाजाचा जाणिवपूर्वक अपमान राज्यसरकारने केलेला आहे. कालपरवा दिनकर राठोड या गोरबंजारा युवकांने पुसद येथे १४ दिवस आमरण उपोषण केले मात्र त्यांची राज्यसरकारने किंचितही दखल घेतली नाही की विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात साधी चर्चा सुद्धा केली नाही त्यामुळे गोरबंजारा समाज प्रचंड संतापलेला असून यावेळी बंजारा समाजाच्या मतावर निवडून गेलेल्या आमदारांनी समाजाचा हा जिवंत प्रश्नाकडे जाणिवपूर्वक कानाडोळा केला. बोगस राजपूत भामटा घुसखोरी च्या प्रश्नाबाबत साधे निवेदन न केलेल्या राज्यसरकारला धडा शिकवण्यासाठी गोरसेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष प्रा संदेश चव्हाण यांनी कंबर कसली असून या वेळी ६२ विधानसभा आमदारांना घरचा रस्ता दाखवण्याचा गर्भित इशारा गोरसेनेने दिले आहे. या अगोदर संपूर्ण राज्यात १८जिल्हायात जोडे मारो आंदोलन केले होते . त्यानंतर संपूर्ण महाराष्ट्रात गोरसेनेने विविध ठिकाणी रास्ता रोको आंदोलन केले होते त्यामध्ये तुळजापूर,जालना, मंठा,पुसद,दिग्रस, दारव्हा, अकोला,वाशीम, हिंगोली,नांदेड,बीड,बुलढाणा आदी ठिकाणचा सामावेश होता . बोगस राजपूत भामटा यांच्या घुसखोरीविरोधात गोरसेनेने रणसिंग फुंकलेले असून गोरसेनेचे आंदोलन हे जन आंदोलन होत आहे.तांडा,वाड्यावरुन या आंदोलनाला जनतेचे मोठे पाठबळ लाभत आहे. विमुक्त जाति (अ) प्रवर्गात अवैध मार्गाने खोटे जात वैधता प्रमाणपत्र घेणाऱ्या लाभाथर्यासह खोटे प्रमाणपत्र वितरित करणाऱ्या अधिकाऱ्यावर कार्यवाही करण्यासाठी विशेष तपासणी पथक ( ) लागू करण्यात यावी . (२) संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा ठिकाणी जिल्हा जात वैधता पडताळणी समितीमध्ये वि . जा . (अ) प्रर्वगातील एका तज्ञ व्यक्तीस शासकिय प्रतिनीधी म्हनुण नेमणुक देण्यात यावी.(३) २४ नोव्हेंबर २०१७ च्या महाराष्ट्र शासनाकडून निर्गमित झालेला रक्त नातेसंबंधाचा निकष लावून जात वैधता प्रमाणपत्र देण्याचे शासन निर्णय ( ) त्वरित रध्द करण्यात यावा.(४ ) संपूर्ण महाराष्ट्रात खरे राजपूत जातीचे लोक प्रत्यक्षात कुठे निवासी राहतात त्या तालुका निहाय जिल्ह्याची यादी शासनामार्फत त्वरित जाहीर करण्यात यावी. (५) राज्य मागास अहवाल क्र ४९ / २०१४ लागु करण्यात यावा . (६) महाराष्ट्र शासनाने विमुक्त भटक्या जमातींना लागू केलेली उन्नत व प्रगत गटाची अट त्वरित रद्द करण्यात यावी.या मागण्या मान्य न झाल्यास येत्या निवडणुकीला संपूर्ण विमुक्त जाती अ प्रवर्गातील जातीचे विशेषतः बंजारा जातीमध्ये तीव्र संताप निर्माण होऊन भविष्यात राज्यसरकारला फार मोठी किमंत चुकवावी लागणार असल्याची चर्चा आहे.

### गावच्या समस्या

पाण्यातुनच ये–जा करावी लागत आहे. ग्रामसेवक नेमुन दिलेल्या दिवशी हजर न राहता ग्रा.पं.चा कारभार मनमानी पद्धतीने हाकत असल्याने तात्काळ बदली करावी. निवेदनाची योग्य दखल न घेतल्यास ग्रा.पं.ला टाळे ठोकण्यात येईल असा इशारा शेवटी निवेदनात मनोज साळवे यांनी दिला आहे.

### होमिओपॅथी महाविद्यालयाच्या

उपचार केले जातात. या वेळेस सदर शिबिर दि. १५ सप्टेंबर २०२४ रविवार रोजी सकाळी ९ ते दुपारी ४ वाजेपर्यंत होणार आहे. ज्या रुग्णांना याचा लाभ घ्यायचा आहे त्यांनी श्री. मुळी ९५०३८७५३११ (सोशल वर्कर, , बीड) यांना संपर्क करून नाव नोंदणी करावी. असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ महेन्द्र गौशाल यांनी केले. कृपया नोंद घ्यावी की नाव नोंदणी बंधनकारक आहे असे डॉ. गणेश पांगारकर (उप–प्राचार्य) यांनी व डॉ. अमित भस्मे (प्राध्यापक व शिबिर समन्वयक) यांनी कळविले आहे.

### माजलगावात आ.सोळंकेंचा

भास्कर शिंदे, लालासाहेब तिडके, सिद्धार्थ ससाने यांची समितीच्या सदस्य पदी निवड करण्यात आली. अशा या भव्य सर्वपक्षीय नागरी सत्कार कार्यक्रमाचे आयोजन लवकरात लवकर करण्यात येणार असल्याचे यावेळी सत्कार समितीचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासणी व सचिव अच्युत लाटे यांनी सांगितले.

**मा.श्री. संजय टी. सहारे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक: १२२४/२०२४**

**( मार्फत विधिज्ञः– श्री एस.डी. जगताप)**

अर्जदार :–१. भिमराव नागनाथ जोगदंड, वय ५६ वर्षे, धंदा शेती,२. जनाबाई नागनाथ जोगदंड, वय ७१ वर्षे धंदा–शेती सर्व रा. वाणगांव, ता. जि. बीड

विरुध्द निरंक

**प्रकरण :– बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

ज्याअर्थी नामे नागनाथ श्रीपती जोगदंड हे/या दि. ३०/०५/२०२३ रोजी बीड येथे मयत असुन अर्जदार क्र.२ ही मयताची पत्नी आहे. तर अर्जदार क्र. १ हा मयताचा मुलगा आहे. अर्जदार शिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदाराचे म्हणणे आहे. अर्जदार असेही म्हणणे आहे की, शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्यलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक:– ३०/०८/२०२४ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

पुढील तारीखः– ०४/१०/२०२४.

**आदेशावरुन,**
**अधिक्षक, दिवाणी**
**न्यायालय, व. स्तर, बीड**

cmyk

राज्य लोकतंत्र शेत-शिवार

बुधवार दि.११ सप्टेंबर २०२४



# महालक्ष्मी गणपतीसाठी फुलबाजारात तेजी

## झेंडूसह फुलांना किलोमागे २५० रुपये देण्याची वेळ

गणपती बाप्पापाठोपाठ आता महालक्ष्म्यांच्या आगमनासाठी घरोघरी उत्साहात तयारी सुरु आहे. राज्यात महालक्ष्म्यांच्या स्वागतासाठी बाजारपेठांमध्ये रेलचेल वाढली आहे. फुलांची बाजारपेठ झेंडूच्या फुलांसह गुलाब, निशीगंध, शेवंती अशा कितीतरी फुलांनी सजला आहे. गणेशोत्सव आणि महालक्ष्म्यांमुळे सध्या फुलांचा बाजार तेजीत असून छत्रपती संभाजीनगरच्या फुलबाजारात झेंडूला किलोमागे साधारण २०० ते २५० रुपये मोजावे लागत आहेत.ऑगस्टच्या शेवटच्या आठवड्यात झालेल्या पावसानं फुलबाजाराला फटका बसला असून उत्पादन खराब झाले आहे. फुलांची आवक घटली आहे. मात्र, मागणी प्रचंड असल्यानं यंदा फुलांसाठी नागरिकांना अधिक पैसे मोजावे लागणार आहेत. छत्रपती संभाजीनगरमध्ये केवडा, लाल फुलांसह झेंडूही महागला आहे.

अतिवृष्टीनं झेंडूची आवक घटली : यंदा राज्यात झालेल्या पावसाने अनेक जिल्ह्यात अतिवृष्टी जाहीर झाली असून हजारो हेक्टर पिकाचे नुकसान झाले. गणेशोत्सवासह महालक्ष्म्याना फुलांना मोठी मागणी असल्याने अनेक शेतकऱ्यांनी झेंडूसह, जरबेरा, गुलाब अशा फुलांचे उत्पादन घेतले होते. अतिवृष्टीने सर्व फुलझाडे खराब झाली असून ऐन सणात फुले खराब झाल्याने शेतकरी हताश आहेत.



झेंडू महागला, किलोमागे २५० रुपये! : छत्रपती संभाजीनगरच्या फुलबाजारात फुलांच्या माळा १००० रुपयांच्या घरात गेल्या असून छोट्या माळा ६०० ते ७०० रुपयाला मिळत आहेत. झेंडू फुलांना अधिक मागणी असल्यानं यंदा बाजारात झेंडूचे दर २०० पार झाल्याचं दिसून येत आहे. अनेक ठिकाणी २०० ते २५० रुपये किलो असा भाव सुरु आहे. कोल्हापूर, सांगली, सोलापूर, सातारा जिल्ह्यातही फुले महागली आहेत. निशिगंधही महागला असून एका काडीमागे साधारण ७० ते ८० रुपये द्यावे लागत असल्याचं ग्राहकांनी सांगितलं.

महाराष्ट्रात फुल उत्पादन ३३५६ हेक्टरात : भारतात सर्वाधिक फुलउत्पादन घेणाऱ्या राज्यांपैकी महाराष्ट्रही एक आहे. महाराष्ट्रात साधारण ३३५६ हेक्टर क्षेत्रावर फुलांचं उत्पादन घेतलं जातं. कार्नेशन आणि जरबेरा यांसारख्या कापलेल्या फुलांच्या पिकांना देशात चांगली बाजारपेठ मिळत आहे.

# बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेअंतर्गत विहिरीसाठी देण्यात येणाऱ्या अनुदानात वाढ



पुणे : युती सरकार सध्या वेगवेगळ्या योजनांची घोषणा करत आहेत. लाडकी बहिण आणि लाडका भाऊ योजनेनंतर आता शेतकऱ्यांसाठी देखील सरकारने एक मोठा निर्णय घेतला आहे. राज्यातील शेतकऱ्यांसाठी सुरू करण्यात आलेल्या बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेत सरकारने मोठा बदल केला आहे. या अंतर्गत दिल्या जाणाऱ्या अनुदानात वाढ करण्याचा मोठा निर्णय घेण्यात आलेला आहे. यामुळे राज्यातील शेतकऱ्यांना दिलासा मिळणार आहे.

राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत झालेल्या या महत्त्वाच्या बैठकीत बिरसा मुंडा कृषी क्रांती योजने अंतर्गत दिल्या जाणाऱ्या अनुदानात किती वाढ करण्याचा निर्णय झाला आहे याबाबत आढावा घेणार आहोत. बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेअंतर्गत आधी विहिरीसाठी अडीच लाख रुपये आणि जुन्या विहिरीसाठी ५० हजार रुपयांचे अनुदान दिले जात होते. मात्र आता शिंदे सरकारने या योजनेअंतर्गत दिल्या जाणाऱ्या अनुदानात वाढ करण्याचा निर्णय घेतला असल्याने आता नवीन विहिरीसाठी चार लाख रुपये आणि जुन्या विहिरीच्या दुरुस्तीसाठी एक लाख रुपयांचे अनुदान दिले जाणार आहे. तसेच इनवेल बोअरिंगचे अनुदान २० हजारांवरून ४० हजार, यंत्रसामग्रीसाठी ५० हजार रुपये, परसबागेकरिता पाच हजार रुपये अनुदान देण्यात येणार आहे. शेततळ्याच्या प्लॅस्टिक अस्तरीकरणासाठी एक लाख रुपये अनुदान देण्यात येत होते पण ते आता प्रत्यक्ष खर्चाच्या ९० टक्के किंवा २ लाख यापैकी जे कमी असेल त्या प्रमाणात दिले जाणार आहे. त्याचप्रमाणे तुषार सिंचनासाठी २५ हजार रुपयांवरून ४७ हजार रुपये किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या ९० टक्के यापैकी जे कमी असेल तेवढी रक्कम अनुदान म्हणून देण्यात येणार आहे. तसेच, ठिबक सिंचन संचासाठी अल्प, अत्यल्प व बहुभूधारकांना ९७ हजार किंवा ठिबक सिंचन संचाच्या प्रत्यक्ष खर्चाच्या ९० टक्के यापैकी जे कमी असेल तेवढे अनुदान देण्यात येणार आहे.

यांना मिळणार लाभ

या योजनेचा लाभ राज्यातील सर्वच शेतकऱ्यांना मिळणार नाही, तर फक्त अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांना याचा लाभ मिळणार आहे. अनुसूचित जमाती म्हणजेच एसटी कॅटेगिरी मधील आदिवासी शेतकऱ्यांना या योजनेअंतर्गत विविध बाबींसाठी अनुदान उपलब्ध करून दिले जाते.

# पीएम किसानच्या १८ व्या हप्त्याची शेतकऱ्यांना प्रतीक्षा

नवी दिल्ली : पंतप्रधान किसान सन्मान योजनेद्वारे शेतकऱ्यांना एका आर्थिक वर्षात शेतकऱ्यांना सहा हजार रुपये दिले जातात. या योजनेद्वारे शेतकऱ्यांना आतापर्यंत १७ हप्त्यांमध्ये ३४ हजार रुपये देण्यात आले आहेत. आता शेतकऱ्यांना पीएम किसान सन्मान योजनेच्या १८ व्या हप्त्याचे २ हजार रुपये कधी मिळणार याची प्रतीक्षा आहे. शेतकऱ्यांना पीएम किसानचा पुढील हप्ता ऑक्टोबर २०२४ मध्ये मिळण्याची शक्यता आहे. त्यापूर्वी शेतकऱ्यांना दोन गोष्टी कराव्या लागणार आहेत. त्या गोष्टी कोणत्या हे जाणून घेणं महत्त्वाचं आहे. पीएम किसान सन्मान योजनेच्या पुढील हप्त्यांद्वारे २ हजार रुपयांची रक्कम नियमितपणे मिळवायची असल्यास शेतकऱ्यांना ई केवायसी आणि जमीन पडताळणी करावी लागणार आहे. ज्या शेतकऱ्यांच्या नावावर शेतजमीन असेल त्याच शेतकऱ्यांना पीएम किसान योजनेचा लाभ मिळतो.



शेतकऱ्यांना काय करावं लागेल? : पीएम किसान सन्मान योजनेचा लाभ ज्या शेतकऱ्यांना मिळतो त्यांना ई केवायसी अनिवार्य करण्यात आली आहे. यासह शेतकऱ्याच्या नावावर जमीन देखील असणं आवश्यक आहे. जे शेतकरी या दोन्ही प्रक्रिया पूर्ण करतील त्यांना पीएम किसान सन्मान योजनेच्या १८ व्या हप्त्याचे दोन हजार रुपये मिळतील. पीएम किसान सन्मान योजनेच्या वेबसाईटला भेट देऊन ऑनलाईन केवायसी करावी लागेल. यासाठी तुम्हाला प्रथम पीएम किसानच्या .. या वेबसाईटला भेट द्या. यानंतर फार्मर कॉर्नरवर ई केवायसी पर्याय निवडा. तिथं तुमच १२ अंकी आधार कार्ड नोंदवा. यानंतर सर्च पर्यायावर क्लिक करा. तिथं तुमचा मोबाईल नंबर नोदवा.यानंतर तुम्हाला ओटीपी मिळेल. तो ओटीपी क्रमांक नोंदवल्यानंतर तुमची ईकेवायसी प्रक्रिया पूर्ण होईल. यासंदर्भातील मेसेज मोबाईल वर प्राप्त होईल. पीएम किसान सन्मान योजना २०१९ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी सुरु करण्यात आली होती. आतापर्यंत केंद्र सरकारनं १७ हप्त्यांमध्ये शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये पैसे वर्ग करण्यात आलेले आहेत. आता शेतकरी अठराव्या हप्त्याच्या प्रतीक्षेत आहेत. दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये अठराव्या हप्त्याचे दोन हजार रुपये जमा होण्याची शक्यता आहे. दरम्यान, केंद्र सरकारच्या धर्तीवर महाराष्ट्र सरकारनं नमो शेतकरी महासन्मान योजना देखील सुरु आहे. पीएम किसान प्रमाणं महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना वार्षिक ६ हजार रुपये दिले जाणार आहेत. महाराष्ट्र सरकारनं आतापर्यंत नमो शेतकरी महासन्मान योजनेद्वारे शेतकऱ्यांच्या खात्यात चार हप्त्यांचे ८ हजार रुपये पाठवले आहेत.

# मूग, उडीद पिकांवरील रोगांचे नियंत्रण

आहारात मुगास अनन्यसाधारण महत्त्व आहे. मुगामध्ये २४ ते २५ टक्के उच्च दर्जाची प्रथिने व मुबलक खनिजे आहेत. या प्रथिनांचे प्रमाण गव्हाच्या दुप्पट, तर तांदळाच्या तिप्पट आहे. कडधान्य पिकामध्ये अल्पावधीत तयार होणारे खरीप व उन्हाळी हंगामातील हे पीक मातीच्या सुपीकतेसाठीही तितकेच महत्त्वाचे पीक आहे. पीक पद्धतीत मुगाचा समावेश केल्यास त्याच्या मुळावरील गाठीमध्ये असलेले रायझोबिअम जिवाणू हवेतील नत्र शोषतात. पिकांची नत्राची गरज भागवली जाते. या पिकानंतर घेतल्या जाणाऱ्या पिकालाही त्याचा फायदा होतो. तसेच हे पीक जमिनीत गाडल्यास हिरवळीच्या खतपिकाप्रमाणे जमिनीचा कस सुधारतो. मात्र हे फक्त ६५ ते ७० दिवस इतक्या कमी कालावधीचे कडधान्य पीक असल्यामुळे बहुतांश शेतकरी त्यावरील रोगांबाबत अनभिज्ञ असतो किंवा दुर्लक्ष करतो. रोगाचा प्रादुर्भाव आणि प्रसार अनुकूल वातावरणामध्ये लवकर होतो. हेक्टरी १२ ते १४ क्विंटल उत्पादन देण्याची क्षमता असलेले पीक अपेक्षित उत्पादन देऊ शकत नाही.

लीफ क्रिंकल विषाणूजन्य रोग :

लक्षणे : मूग किंवा उडीद पीक पेरल्यानंतर साधारणतः तीन आठवड्यांनंतर या रोगाची लक्षणे दिसायला सुरुवात होते. सर्वप्रथम पानातील हरितद्रव्य कमी झाल्यामुळे पाने फिकट पिवळसर दिसतात. रोगग्रस्त झाडांच्या पानांवर खोलगट व उभारलेले भाग दिसतात. पानांच्या कडा खालच्या बाजूला वळतात. झाडांची वाढ खुंटते. झाडे शेंड्याकडून खाली वाळत येतात. प्रादुर्भावग्रस्त झाडांना शेंगा येत नाही. आल्या तरी त्या संख्येने खूप कमी, आकाराने लहान, वेड्या वाकड्या असतात. विषाणूजन्य रोग हे अत्यंत नुकसानदायक आहे. ते येऊच नयेत यासाठी दरवर्षी आणि सातत्याने व्यवस्थापन पद्धतीमध्ये खालील प्रतिबंधात्मक बाबींचा अंतर्भाव करावा. शेतातील रोगकारक घटकांचा नाश करण्यासाठी लागवडीपूर्वी उन्हाळ्यात जमिनीची खोल नांगरणी करावी. काडीकचरा गोळा करून जाळून नष्ट करावा. पेरणी करताना जास्त दाट करू नये. त्यातील अंतर ३० बाय १० किंवा ४५ बाय १० सें.मी. ठेवावे. रोगाचा प्रसार रोगग्रस्त बियाण्यामुळे होतो. पेरणीकरिता विषाणुमुक्त बियाण्याचा वापर केला पाहिजे. शेत तणाविरहित ठेवावे. ईश्वरी, खोटी, चवळी आणि कुंजर या तणावरही या रोगाचा विषाणू जिवंत राहतो. तो नंतर रसशोषक किडी मावा, पांढरी माशी आणि फुलकिड्याद्वारे मूग /उडीद पिकावर येतो. मूग पिकाबरोबर आंतरपीक म्हणून ज्वारी, बाजरी आणि मका ही पिके घेतल्यास कीटकाद्वारे रोगाचा प्रसार कमी होतो. ही पिके अडथळा म्हणून काम करतात. पिकास जास्त नत्रयुक्त खत देऊ नये.



पिकांची कायिक वाढ होते. किडींचा प्रादुर्भाव वाढतो. जमिनीत दरवर्षी एकच पीक न घेता पिकांची फेरपालट करावी. हा रोग बियाण्याद्वारे पसरत असल्यामुळे बियाण्यास गरम पाण्याची प्रक्रिया करावी. बियाणे ५२ अंश सेल्सिअस तापमानाच्या पाण्यात २० ते ३० मिनिटे बुडवून ठेवल्यानंतर पेरणीसाठी वापरावे. किंवा रसशोषक किडींचा सुरुवातीच्या काळातील प्रादुर्भाव रोखण्यासाठी इमिडाक्लोप्रिड (७० टक्के डब्ल्यूजी) ५ ग्रॅम किंवा इमिडाक्लोप्रिड (४८ टक्के एफएस) १० ग्रॅम प्रति किलो या प्रमाणे बीजप्रक्रिया करावी.

सद्यःस्थितीतील व्यवस्थापन : पांढऱ्या माशीचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी शेतात १५ बाय ३० सें.मी. आकाराचे पिवळे चिकट सापळे हेक्टरी १६० प्रमाणात पिकाच्या उंचीच्या समकक्ष उंचीवर पेरणीनंतर १५ दिवसांनी लावावे. मावा, पांढरी माशी व फुलकिडे यांचा प्रादुर्भाव दिसताच, तज्ज्ञांचा सल्ला घेऊन शिफारशीत आंतरप्रवाही कीडनाशकाच्या फवारणीचे नियोजन करावे.

केवडा : हा रोग विषाणूजन्य आहे. पानावर अनियमित हिरव्या व पिवळ्या रंगांचे चट्टे दिसून येतात. नवीन येणारी पाने पूर्णपणे पिवळे झालेली दिसतात. प्रादुर्भावग्रस्त झाडांना फुले व शेंगा खूप कमी लागतात. शेंगा आकाराने लहान, वाकड्या, पिवळ्या रंगाच्या राहतात. उन्हाळ्यामध्ये हा रोग जास्त प्रमाणात आढळून येतो. या रोगाचा प्रसार पांढऱ्या माशीमुळे होतो. या वर्षीप्रमाणे जुलै महिन्यात सरासरीपेक्षा जास्त पाऊस तसेच ऑगस्ट महिन्यामध्ये खूपच कमी पाऊस असे वातावरण या रोगाकरिता पोषक आहे.

उपाय : बनतुळस, क्रोटॉन आणि भृंगराज अशा पूरक तणांचा नायनाट करावा. सुरुवातीला प्रादुर्भावग्रस्त झाडे उपटून नष्ट करावीत. शेतामध्ये पांढऱ्या माशीच्या नियंत्रणासाठी १६० पिवळे चिकट सापळे हेक्टरी लावावे. ५ टक्के निंबोळी अर्काची किंवा ॲझाडिरॅक्टीन (१० हजार पीपीएम) फवारणी करावी. मावा, पांढरी माशी व फुलकिडे यांचा प्रादुर्भाव दिसताच तज्ज्ञांचा सल्ला घेऊन शिफारशीत आंतरप्रवाही कीडनाशकाच्या फवारणीचे नियोजन करावे. भुरी रोग : लक्षणे : या रोगाचा प्रादुर्भाव रोपावस्थेत होतो. पानावर सुरुवातीलाच लहान, अनियमित, पांढरे चट्टे दिसतात. रोगाची तीव्रता जास्त असल्यास बुरशी संपूर्ण पानावर,फांद्यावर व फुलावर पसरते. पाने, फुले गळून पडतात. पानाच्या दांड्या, शेंगा आणि खोडावर सुद्धा पांढरे चट्टे आढळतात. उत्पादनात खूप घट येते. या रोगाच्या वाढीकरिता २२ ते २५ अंश तापमान व ढगाळ वातावरण अनुकूल आहे.

व्यवस्थापन : भुरी रोग दिसताच फवारणी प्रति लिटर पाणी, गंधक (पाण्यात मिसळणारे) २.५ ते ३ ग्रॅम किंवा कार्बेन्डाझिम (५० टक्के डब्ल्यूपी) १ ग्रॅम. (लेबल क्लेम)

सर्कोस्पोरा पानावरील ठिपके/लक्षणे : हा रोग सर्कोस्पोरा या बुरशीमुळे होतो. लहान गोलाकार, मध्यभागी तपकिरी, कडा लालसर असे चट्टे पानांवर आढळतात. कालांतराने चट्ट्यांचा आकार मोठा होतो. त्यामुळे अनेक ठिपके एकमेकांत मिसळल्यामुळे खूप मोठे चट्टे पानावर तयार होते. पाने करपल्यासारखे दिसतात. अनुकूल वातावरणात पीक फुलोऱ्यावर व शेंगा भरण्याच्या अवस्थेत असताना मोठ्या प्रमाणात पानगळ होते. रोगाची तीव्रता जास्त असल्यास तपकिरी चट्टे पानाच्या देठावर फांद्यावर व शेंगावरही आढळतात. या रोगाचा प्रसार रोगग्रस्त बियाणे व हवेद्वारे होतो. हा रोग वाढीसाठी २२ ते ३० अंश तापमान व ९० ते ९५ टक्के वातावरणातील आर्द्रता अनुकूल ठरते.

उपाय : शेत तणाविरहित ठेवावे. शिफारशीत अंतरावर बियाणे पेरणी करावी. रोगाच्या व्यवस्थापनाकरिता मेटीराम (५५ टक्के) अधिक पायरॅक्लोस्ट्रॉबिन (५ टक्के डब्ल्यूजी) (संयुक्त बुरशीनाशक) ३ ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणे फवारणी करावी. (लेबल क्लेम)

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१२९७ : स्टर्लिंग ब्रिजच्या लढाईत स्कॉटिश सैन्याने इंग्लंडचा पराभव.
१७७३ : बेंजामिन फ्रँकलिनने रुल्स बाय विच ए ग्रेट एम्पायर मे बी रिड्युस्ड टू ए स्मॉल वन हा निबंध प्रकाशित केला.
१७९२ : होप हिरा चोरला गेला.
१८९३ : स्वामी विवेकानंद यांनी जागतिक सर्वधर्म परिषदेसमोर आपले गाजलेले भाषण केले.
१९०६ : म. गांधींनी द. आफ्रिकेत सत्याग्रह हा शब्द पहिल्यांदा वापरला.
१९१९ : अमेरिकन सैन्याने होंडुरास ताब्यात घेतले.
१९४१ : अमेरिकेने पेंटागॉन बांधायला सुरुवात केली.
१९४२ : आझाद हिंद सेनेने जन गण मन राष्ट्रगीत म्हणून गायले.
१९६१ : 'विश्व प्रकृती निधी' ची स्थापना झाली.
१९६५ : भारत पाक युद्ध भारतीय सैन्याने लाहोरजवळील बुर्की गाव ताब्यात घेतले.
१९७२ : नाट्यमंदार निर्मित आणि प्रा. मधुकर तोरडमल लिखित व दिग्दर्शित 'तरुण तुर्क, म्हातारे अर्क' या नाटकाचा पहिला प्रयोग इचलकरंजी येथील डेक्कन स्पिनिंग मिलच्या गणेशोत्सवात झाला. थिएटरमधील पहिला प्रयोग ५ आक्टोबर १९७२ रोजी मुंबईच्या रविंद्र नाट्यमंदिरात झाला.
२००१ : अमेरिकेत ठिकठिकाणी झालेल्या अतिरेकी हल्ल्यात २९९६ लोक ठार झाले. यावेळी अध्यक्ष जॉर्ज बुश यांना तातडीने अज्ञातस्थळी हलवले गेले. अमेरिकेचे जर एखाद्या देशाशी अणूयुद्ध झालेच तर राष्ट्राध्यक्षांच्या सुरक्षिततेसाठी अमेरिकेत ७५ हून अधिक ठिकाणी जमिनीखाली विषेश व्यवस्था तयार ठेवण्यात आलेली आहे. पेंटॅगॉन या अमेरिकेच्या लष्करी मुख्यालयावर झालेल्या हल्ल्यात सुमारे दहा कोटी डॉलरचे नुकसान झाले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८१६ : जर्मन संशोधक कार्ल झाइस यांचा जन्म.
१८६२ : इंग्लिश लेखक ओ. हेन्री यांचा जन्म.
१८८४ : भारतीय कार्यकर्ते आणि राजकारणी सुधीमय प्रामाणिक यांचा जन्म. (मृत्यू: २ ऑक्टोबर १९७४)
१८८५ : डी. एच. लॉरेन्स इंग्लिश कादंबरीकार, कवी, नाटककार, टीकाकार आणि चित्रकार (मृत्यू: २ मार्च १९३०)
१८८८ : अर्टिजेंनाचे राष्ट्राध्यक्ष दॉमिंगो फॉस्तिनो सार्मियेंतो यांचे निधन.
१८९५ : आचार्य विनोबा भावे भूदान चळवळीचे प्रणेते, महात्मा गांधींचे पट्टशिष्य, भारतरत्न १९८३ मरणोत्तर, १९४० मध्ये महात्मा गांधींनी वैयक्तिक सत्याग्रहाच्या केलेल्या आंदोलनात पहिला सत्याग्रही म्हणून विनोबांची निवड केली. भूदान यज्ञात विनोबांनी देशभर पदयात्रा केली. (मृत्यू: १५ नोव्हेंबर १९८२)
१९०१ : आत्माराम रावजी देशपांडे तथा 'कवी अनिल' साहित्य अकादमी पारितोषिक विजेते, साहित्य संमेलनाचे व साहित्य महामंडळाचे अध्यक्ष, 'प्रेम आणि जीवन', ' भग्नमूर्ती', 'चिनी मुलास', 'निर्वासित' ही खंडकाव्ये प्रसिद्ध आहेत. प्रौढ शिक्षणविषयक कार्यासाठी त्यांना नेहरू पारितोषिक मिळाले होते. (मृत्यू: ८ मे १९८२)
१९११ : भारतीय क्रिकेटपटू लाला अमरनाथ यांचा जन्म. (मृत्यू: ५ ऑगस्ट २०००)
१९१५ : पुपुल जयकर सामाजिक कार्यकर्त्या आणि भारतीय कला व संस्कृतीच्या पुरस्कर्त्या (मृत्यू: २९ मार्च १९९७)
१९१७ : फर्डिनांड मार्कोस फिलिपाइन्सचे १० वे राष्ट्राध्यक्ष (मृत्यू: २८ सप्टेंबर १९८९)
१९३९ : ऍडॉब सिस्टम चे संस्थापक चार्ल्स गेशेके यांचा जन्म.
१९८२ : तामिळ चित्रपट अभिनेत्री श्रीया शरण यांचा जन्म.
१९८३ : विनोबा भावे यांना मरणोत्तर भारतरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आलं.
१९७६ : भारतीय क्रिकेटर मुरली कार्तिक यांचा जन्म.
१९९७ : नासाचे मार्सग्लोबल सर्व्हेयर हे अंतराळयान मंगळावर पोहोचले.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९२१ : सुब्रम्हण्यम भारती तामिळ साहित्यिक (जन्म: ११ डिसेंबर १८८२)
१९४८ : बॅ. मुहम्मद अली जिना पाकिस्तानचे प्रणेते व पहिले गव्हर्नर जनरल (जन्म: २५ डिसेंबर १८७६)
१९६४ : गजानन माधव मुक्तिबोध हिन्दी कवी, लेखक, टीकाकार व संपादक (जन्म: १३ नोव्हेंबर १९१७)
१९७१ : निकिता क्रूश्चेव्ह सोविएत युनियनचे राष्ट्राध्यक्ष (जन्म: १५ एप्रिल १८९४)
१९७३ : चिलीचे राष्ट्राध्यक्ष साल्वादोर ॲलेंदे याचं निधन.
१९७३ : भारतीय तत्त्वज्ञ आणि गुरू नीम करळी बाबा यांचे निधन.
१९७८ : बल्गेरियाचे कवी जॉर्जी मार्कोव्ह यांना फाशी देण्यात आली.
१९८७ : महादेवी वर्मा हिन्दी कवयित्री, स्वातंत्र्यसैनिक, शिक्षणतज्ज्ञ, प्रयाग महिला विद्यापीठाच्या प्राचार्या (१९३३) व कुलगुरू, 'यामा' या काव्यसंग्रहासाठी त्यांना ज्ञानपीठ पुरस्कार देण्यात आला. (जन्म: २६ मार्च १९०७)
१९९८ : क्रीडा महर्षी प्रिं. नोशीरवान दोराबजी तथा एन. डी. नगरवाला क्रिकेटपटू, कुशल क्रीडा संघटक (जन्म: १० आक्टोबर १९०९ अहमदनगर, महाराष्ट्र)

cmyk

# मराठा, दलित, मुस्लिम एकत्र येऊ, गरिबांची सत्ता काबीज करू - मनोज जरांगे

## आमची सामाजिक आघाडी आहे, हीच खरी शिवशक्ती भीमशक्ती आहे – दीपक केदार

पाटोदा। प्रतिनिधी

मराठा आंदोलक मनोज जरांगे आणि दलित, मुस्लिम, आदिवासी समूहाचे नेते दिपक केदार यांनी ऑल इंडिया पँथर सेनेच्या जिल्हा कार्यालयाचे उदघाटन केले. जिल्हा अध्यक्ष नितीन सोनवणे यांचे हे संपर्क कार्यालय आहे. यावेळी मनोज जरांगे यांनी सत्ता काबीज करण्यासाठी मुस्लिम दलितांना साथ देण्याचे आवाहन केले.

आपण वेगळे नाहीत. आपल्यात दुरावा निर्माण करणारा कोण आहे हे सगळ्यांना माहित आहे. आता जर आपण सगळे एक झालो तर ही गरिबांची सत्ता काबीज होणार. आपण तिघांनी ऐकमेकांच्या अंगावर येईच नाही हे ठरवलं पाहिजे. दांडा उचलणारे तीनच लोक आहेत. एक दांडा उचलतो मराठा, दुसरा मुसलमान, तिसरा दलित हे दांडके उचलणारे संपले कि सगळे भांडणं संपले. आपल्या तिघांवरती हे सत्ता काबीज करतात. मला कोणत्याही पदाची लालसा नाही, तुमच्या सर्वांच्या साक्षीने सांगतो मी जिवंत आहे तोवर हटत नाही. जर असाच अन्याय केला तर देवेंद्र फडणवीस सरकार पाडल्याशिवाय शांत बसणार नाही. वर्षभरात अनेक ट्रॅप रचले, उपदव्याप केले. आमदार, खासदार, मंत्री, पक्षाचे कार्यकर्ते थकले आता अंतरवलीत अंधारात येऊन झाडाच्या खोडात लपून बसण्याची वेळ आली. मीडिया



गेली कि हळूच येतात. म्हणजे इतकी वाईट परिस्तिथी सर्वसामान्यांच्या एकजुटीमुळे आली. ही एकजुटीची ताकद ओळखा. सर्व राखीव मतदारसंघात ७० हजार मत मराठ्यांची आहेत. यावेळी आपण सगळे मिळून ते सत्ता काबीज करू! आपला मुख्य शत्रू आपण ओळखला आहे. आंदोलन सुरु झाल्यापासून सामाजिक परिवर्तन आले आहे. ऍट्रॉसिटी ऍक्ट च्या गुन्ह्यात ९०% कमी झाली आहे. आपल्यात भांडणंच होऊ देईचे नाहीत. दलित, मुस्लिम, मराठा समाजाने क्रांती केली आणि लोकसभेला २९ जागा पाडून टाकल्या. आता येणाऱ्या निवडणुकीत सुद्धा गरिबांची सत्ता आणण्यासाठी पाडा म्हणलो कि पाडा आणि आणा म्हणलो कि आणा हे करावचं लागेल. दलित, मुस्लिम बांधवानो, आपल्याला आता घरा घरात जाऊन आपल्या खऱ्या शत्रूची ओळख करून द्यावी लागेल. मी लय दिवस भुयार तयार केलं आणि एकदाच हिसका दाखवून दिला तसंच आपल्याला या समूहात करावे लागेल. राज्यच नाही देशात सुद्धा आपला परिणाम दिसेल एवढी क्रांती आणणार. बीड ते अंतरवली सराटी मला ८ तास लागतात एवढं प्रेम समाज करतो. शेतकरी, कष्टकरी, दलितांची सत्ता आणण्यासाठी सज्ज व्हा!

ऑल इंडिया पँथर सेनेचे दीपकभाई केदार हे गोरगरिबांच्या न्यायासाठी लढतात त्यांना शुभेच्छा देतो असे मत मराठा आंदोलक आदरणीय मनोज जरांगे यांनी केले.

यावेळी ऑल इंडिया पँथर सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष दिपक केदार यांनी जहाल मत व्यक्त करत मनोज जरांगेच्या अंगावर जो येईल त्याला हा भीमाचा वाघ सोडणार नाही. काल पर्वा बार्शीचं नवं अंड बाहेर आलं आहे. ते आजवर कुणाचंच झालं नाही. बाळासाहेब ठाकरे यांना कोंबडीचोराने धोका दिल्यावर अंडे घेऊन बाहेर पडलेला हाच आहे. त्याला कुणी तरी धमकी दिली तर अधिवेशनात देवेंद्र फडणवीस धमकी देणार्याला अटक करण्याची मागणी करत होते. आज त्या आमदाराने मनोज जरांगेचे तुकडे करण्याची धमकी दिली आता का त्याला फडणवीस अटक करा म्हणत नाहीत. त्याने खुलासा केला पाहिजे कुणाचे तुकडे करणार मराठा आंदोलकांचे? मराठा लेकरांचे? सामाजिक आंदोलनाचे? कि जरांगेचे? तुकडे कुणाचे याचा खुलासा झाला पाहिजे. अनेक राजकीय आघाड्या येत आहेत मला माहित नाही जरांगे काय निर्णय घेणार पण हा आमचा सामाजिक पाठींबा आहे ही आमची सामाजिक आघाडी आहे. लाड, राणे, दरेकर यांना आम्हीच काफी आहेत. यांचा खेळ गुंडाळलेला आहे. मनोज दादा मला जरा थांबा म्हणतात नाही तर पॅन्थर काय आहे ते दाखवून देऊ. येणाऱ्या काळात मोठी क्रांती होणार आहे. दलित, आदिवासी, मुस्लिम, मराठा हे एकत्र आले आहेत आणि क्रांतीसाठी सज्ज झाले आहेत. आता जरांगेना समाजाने काळजीपूर्वक सांभाळले पाहिजे. ते आता व्यक्तिगत हल्ले करायला लागलेत, त्यामुळे अनेकांना यापुढे मोठा सामना करावा लागेल.ऑल इंडिया पँथर सेनेचा हा कार्यक्रम मोठ्या शिवशक्ती भीमशक्तीची नांदी आहे. हा ऐतिहासिक क्षण आहे, ही आघाडी प्रामाणिक आहे. लोकसभेच्या आधी सगळे जण जरांगे जरांगे करत होते ते सगळे गेले पण मी गेलो नाही. ऑल इंडिया पँथर सेना मनोज जरांगे यांच्या सोबत आहे. असे आश्वासन देऊन कुणालाही वाटत नव्हतं जरांगे येतील पण मी सांगितलं दादा त्यांच्या भावासाठी येणार यातून हे संघर्षाचं नातं आणखी मजबूत झालं आहे. यावेळी पत्रकार भागवत तावरे यांनी आपलं मत व्यक्त केलं आणि विस्तापितानी आता राजकीय भूमिका घेतली पाहिजे. मनोज जरांगे आणि दीपक केदार हे एकत्र आल्यामुळे राजकीय क्रांती होणार आहे. दलिताना गावा गावात जाऊन सुरक्षित करण्यासाठी दीपकभाई मोठा संघर्ष करत आहेत. ते इतर नेत्यांसारखे नाहीत त्यांच्याकडे पँथरची जिगरबाज क्षमता आहे. मनोज जरांगे यांना माझं आवाहन आहे कि आता राजकीय भूमिकेशिवाय आपल्याला पर्याय नाहीत. तिथे गेलो तरच आपला हक्क आपण रीतसर घेऊ शकतो. या दोन्ही शक्ती एकत्र आल्यामुळे राज्यात नवं परिवर्तन होण्यास कुणीच रोखू शकत नाही असे प्रखड मत यावेळी त्यानी व्यक्त केले. हजारों भीमसैनिक मराठासैनिक उपस्थित होते. कार्यलयाची फित कापून उदघाटन करून अधिकृत उदघाट घोषित करण्यात आले. यावेळी शेकडो तरुणांनी एकच जल्लोष आणि मनोज जरांगे आगे बडो, दिपकभाई केदार आगे बडो च्या जोरदार घोषणाबाजी केली. अतिशय उत्साहाच्या वातावरणात हा सोहळा संपन्न झाला. वकील संघांचे अध्यक्ष आंबेडकरी अभ्यासक मार्गदर्शक ऍड. अविनाश गंडले यांनी शुभेच्छा देऊन दिल्या व कार्यक्रमाचे अध्यक्ष पद भूषवले.

## थोडक्यात



### वसंतदादा पाटील महाविद्यालयात सामान्यज्ञान परीक्षा

पाटोदा । प्रतिनिधी

येथील नवगण शिक्षण संस्था संचालित वसंतदादा पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात १० सप्टेंबर रोजी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रामार्फत सामान्यज्ञान परीक्षा यशस्विरित्या संपन्न झाली. प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या परीक्षेत कनिष्ठ व वरिष्ठ विभागाच्या एकूण ६५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. याप्रसंगी परीक्षेचे अवलोकन करण्यासाठी प्राचार्य प्रोफेसर आबासाहेब हांगे यांच्यासह उपप्राचार्य डॉ. सतिष माउलगे, उपप्राचार्य डॉ. अभय क्षीरसागर, पदव्युत्तर विभाग संचालक डॉ. गणेश पाचकोरे, पर्यवेक्षक प्रा. अनिल जोगदंड, आयक्यूएसी समन्वयक डॉ. मनोजकुमार प्रकाश उपस्थित होते. परीक्षेच्या यशस्वी आयोजनाकरिता मार्गदर्शन केंद्राचे अध्यक्ष डॉ. कल्याण घोडके व सदस्य प्रा. रुपेश कोकाटे, प्रा. गणेश देशमाने, प्रा. शेख समद, प्रा. बाळासाहेब कांबळे, प्रा. सतीश कदम यांनी विशेष परिश्रम घेतले.

### प्रा.माधव साके यांना उमेदवारी द्यावी–गोंदकर



म्हसोबावाडी : आगामी विधानसभा निवडणुकीत आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघातून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाकडून बीड जिल्हा उपाध्यक्ष प्रा.माधव साके यांना उमेदवारी द्यावी अशी मागणी आष्टी तालुका सरचिटणीस सचिन बप्पा गोंदकर यांनी एका पत्रकाद्वारे केली आहे. शेतकरी कुटुंबात जन्मलेले प्रा.माधव साके यांना शेतकऱ्यांच्या अडचणी समस्या हे जवळून माहिती आहेत.आत्ता पर्यंत प्रस्थापित पुढाऱ्यांनी मतदात संघातील जनतेची खोटी आश्वासने देऊन फक्त दिशाभूल केली आहे.कोट्यावधी रुपयांचा निधी येऊनही उन्हाळ्यात टँकर चालू असतात.कित्येक ठिकाणी पाणी विकत प्यावे लागते आहे.मतदार संघात समस्यांचा डोंगर उभा असून यासाठी एका युवा नेतृत्वाची गरज असून प्रा.माधव साके पर्याय म्हणून दिसत आहे.२०११ पासून चळवळीत काम करणारे सामाजिक आणि धार्मिक कार्यात नेहमी अग्रेसर असणारे कुठलाही राजकीय वारसा नसताना मतदार संघात निष्ठेने जनसेवा करणारे प्रा.माधव साके यांच्या पाठीमाघे खंबीरपने उभे राहून मतदार संघातील सर्व विस्थापितांनी एकत्र येऊन प्रस्थापितांना हद्दपार करावे.पक्षश्रेष्ठी यांनी प्रा.माधव साके यांना उमेदवारी देऊन निष्ठेला न्याय द्यावा,अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाचे आष्टी तालुका सरचिटणीस सचिन बप्पा गोंदकर यांनी केली आहे.

# कार्यक्षम आणि दूरदृष्टीचे नवयुवक तरुण हा गावाच्या विकासाचा कणा –राजश्री मुंडे

### पौळ पिंपरी येथील कार्यक्रमात प्रतिपादन; अभिष्टचिंतन सोहळ्यास उपस्थिती

परळी। प्रतिनिधी

गावाची ओळख ही त्या गावची संस्कृती आणि ती संस्कृती टिकवून ठेवणाऱ्या लोकांवर अवलंबून असते. ग्रामीण भाग हा जरी देशाच्या एकूण व्यवस्थेचा कणा असला तरी त्या गावच्या अनेक समस्या असतात. महापुरुषांच्या विचारांनी प्रेरित होऊन गावांसाठी अहोरात्र मेहनत घेणारे तरुण पुढे आले पाहिजेत, समाजकारण आणि राजकारणाच्या माध्यमातून ग्रामविकास साधून घेता आला पाहिजे. म्हणूनच कार्यक्षम आणि दूरदृष्टी असलेले तरुण हेच कुठल्याही गावाच्या विकासाचा कणा असतो असे प्रतिपादन सौ. राजश्री धनंजय मुंडे यांनी केले. त्या पौळ पिंपरी येथे आयोजित एका कार्यक्रमात बोलत होत्या. कार्यक्रमाच्या सुरुवातीस त्यांनी गावातील भव्य जिजाऊ स्मारकास भेट देऊन



अभिवादन केले.

तालुक्यातील मौजे पौळ पिंपरी येथे सरपंच माणिकराव पौळ यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने आयोजित अभिष्टचिंतन सोहळ्यास सौ.राजश्री धनंजय मुंडे यांची उपस्थिती होती. त्या आपल्या भाषणात पुढे म्हणाल्या की, राज्याचे कृषिमंत्री ना.धनंजय मुंडे आणि त्यांच्यासोबत सवलीप्रमाने असलेले वाल्मीक अण्णा कराड यांचे नेहमीच अनेक विकासात्मक गोष्टींना प्रोत्साहन असते. गाव खेड्यातील अनेक तरुण कार्यकर्ते वेगवेगळ्या समस्या घेऊन त्यांच्यापर्यंत येण्याच्या आधीच विकासासाठी आवश्यक मूलभूत गोष्टींची व्यवस्था ते करतात. पौळ पिंपरी या गावात सरपंच माणिकराव पौळ यांच्या संकल्पनेतून अनेक विकास कामे सुरू आहेत. बरीच कामे कृषिमंत्री ना.धनंजय मुंडे आणि वाल्मीक अण्णांच्या पाठबळावर पूर्ण झाली आहेत. यामुळे गावाचा विकासाच्या दृष्टीने पूर्णपणे कायापालट झाला असल्याचे मत त्यांनी या कार्यक्रमात व्यक्त केले. पौळ पिंपरी येथे सरपंच माणिकराव पौळ यांच्या वाढदिवसानिमित्त भव्य अभिष्टचिंतन सोहळा आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमास ज्येष्ठ नेते राजाभाऊ पौळ, बबन आप्पा पौळ, संजय गांधी निराधार समितीचे अध्यक्ष चंद्रकांत कराड, नितीन निर्मळ, चंद्रकांत सोनवणे, पांडुरंग काळे, वसंत राठोड, सुरेश माने, तुकाराम आचार्य, उपसरपंच गणेश आबा पौळ यांच्यासह सर्व ग्रामपंचायत सदस्य यांची उपस्थिती होती. कार्यक्रमास मोठ्या संख्येने गावातील व पंचक्रोशीतील नागरिकांची उपस्थिती लाभली. विशेष म्हणजे महिलांची संख्या लक्षणीय होती.

# भगवानबाबांनी मानवाच्या कल्याणासाठी देह झिजवला - प्रकाश महाराज साठे



दिंद्रुड । प्रतिनिधी

श्री राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या जयंतीच्या निमित्ताने माजलगाव तालुक्यातील बडेवाडी येथे कीर्तन व सर्व रोग निदान शिबिराचे आयोजन ग्रामस्थांच्या वतीने मंगळवारी करण्यात आले होते. पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी कीर्तना श्रवण करण्या सोबतच आरोग्य शिबिर व महाप्रसादाचा लाभ घेतला. संत भगवान बाबांनी समस्त मानव जातीच्या कल्याणासाठी आपला देह झिजवला असल्याचे प्रतिपादन ह भ प प्रकाश महाराज साठे यांनी केले.जय भगवान महासंघाचे अध्यक्ष बाळासाहेब सानप, रविराज बडे, जैतापूर सरपंच भागवत दराडे, ज्येष्ठ पत्रकार बंडू खांडेकर यांची प्रमुख उपस्थिती या प्रसंगी होती.

ह भ प प्रकाश महाराज साठे यांनी राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या आध्यात्मिक जिवनाचा आलेख कीर्तनाद्वारे मांडला. जिवनात संतांच्या अभंग रुपी ज्ञानामुळे सुख, शांती व समाधान लाभते. संत वचनाने मानवी जीवनात ज्ञानाची भर पडत असल्याचे साठे महाराजांनी कीर्तनाच्या माध्यमातून प्रतिपादित केले. तुम्ही संत मायबाप कृपावंत! काय मी पतीत कीर्ती वाणु!! या अभंगाद्वारे प्रबोधन करताना ऐश्वर्यसंपन्न राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या अध्यात्मिक कारकिर्दीचा त्यांनी उहापोह केला. साधुसंतांनी माणसाच्या जीवनात अध्यात्म व नामस्मरणाचे महत्त्व काय असते? हे आपल्या वाणी व अभंगातून विशद करून ठेवले आहे. त्यामुळेच वर्तमान व भविष्य काळात माणुसकी टिकून असल्याचे महाराजांनी सांगितले. राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या जयंतीनिमित्त बीड येथील हाडरोग तज्ञ डॉ गणेश केदार यांनी येथील आबाल वृद्धांची आरोग्य तपासणी करून मोफत औषधोपचार केले. बडेवाडी परिसरातील शेकडो नागरिकांनी कीर्तन श्रवण व सर्व रोग निदान शिबिराचा लाभ घेतला. विराट मुंडे, विठ्ठल बडे, लहू बडे, बंडू बडे, रामहरी तिडके, ज्ञानेश्वर बडे, भरत बडे, लक्ष्मण बडे यांच्यासह सर्व बडेवाडी ग्रामस्थांनी या सोहळ्याचे आयोजन केले होते.

# ग्रामीण बँकेच्या वडवणी शाखेचे नविन जागेत स्थलांतर

## ग्राहकांच्या सहकाऱ्यामुळेच वडवणी शाखेची यशस्वी वाटचाल –वानखेडे

वडवणी। प्रतिनिधी

वडवणी शहर व कार्यक्षेत्रातील दत्तक गावातील ग्राहकांच्या सहकार्यामुळेच महाराष्ट्र ग्रामीण बँक शाखा वडवणी ही यशस्वीपणे वाटचाल करत आहे व आगामी काळातही असेच मोलाचे सहकार्य करावे असे आवाहन महाराष्ट्र ग्रामीण बँकेचे क्षेत्रीय व्यवस्थापक यशवंत वानखेडे यांनी केले वडवणी येथील ग्रामीण बँकेचे येथील पोलिस स्टेशनच्या बाजुस असणाऱ्या बादशहा काम्पलेक्स येथे स्थलांतर झाले या निमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते या कार्यक्रमास उपक्षेत्रीय व्यवस्थापक सानप सर वसुली अधिकारी भराटे सर उपस्थित होते उपरोक्त मान्यवरांच्या हस्ते सर्वप्रथम दिपप्रज्वलन व प्रतिमापुजन करण्यात आले तदनंतर उपस्थित



मान्यवरांचा सत्कार मा.परमेश्वरजी मायकर मा.प्रणय पाटील सर व सौ.किरण वाकळे-गिरगे मॅडम यांचे हस्ते सत्कार करण्यात आला.

आपल्या प्रास्ताविक पर भाषणात शाखा व्यवस्थापक मायकर सर म्हणाले कि वडवणी तील ग्राहक व शेतकरी सुज्ञ व सुसंस्कृत असल्याने मी व सहकारी मित्रांनी केलेल्या पिक कर्ज नुतनीकरण कामात आम्हाला यश प्राप्त होऊन आम्ही जिल्ह्यात ८५% नुतनीकरण करून पहिला क्रमांक पटकावला आहे यात ग्राहक यांचाच सिंहांचा वाटा आहे या कामी आम्हाला लाभलेले क्षेत्रीय व्यवस्थापक मा.वानखेडे सर यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभले आहे अशा या कामगिरीमुळे माझी जन्मभूमी हीच कर्मभूमी ठरत आहे आगामी काळात ही असेच सहकार्य लाभले तर मी आणखी काम करून शाखा जिल्हा स्तरावर कायम नंबर एकवर ठेवील या कार्यक्रमास व्यापारी आंडील दत्ता गार्डी सदरेकाका मनोज बारटक्के तसेच बाजार समितीचे कर्मचारी हस्ते आंधळे चव्हाण गणेश कोळपे तसेच सोशल मिडिया चे राज्याध्यक्ष तथा डोंगराचा राजांचे संपादक अनिल वाघमारे मराठी पत्रकार परिषद वडवणी चे अध्यक्ष विनायकराव जाधव सचिव सतिश सोनवणे प्रजापत्रचे ता.प्रतिनिधी बाबुराव जेधे एम डि एल न्युज चॅनल चे संपादक ओमप्रकाश साबळे दै.झुंजारनेताचे ता.प्रतिनिधी ज्ञानेश्वर वाव्हळ सुधाकर काका पोटभरे महिला पत्रकार गितांजली वानखेडे महेश सदरे यांचेसह अनेक मान्यवर उपस्थित होते उपस्थित मान्यवरांचा बँकेच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बँकेतील अधिकारी मा.प्रणय पाटील सौ.योगिता जाधव सौ.किरण वाकळे मा.अजित पाटील कर्मचारी गोरक्ष पंधारे विशाल कसबे बैंकमित्र शांति नाथ जैन पुरुषोत्तम गिलबिले प्रदिप निपटे महादेव सरक सुरेश साबळे आदींनी परिश्रम घेतले कार्यक्रमाचे सुत्रसंचलन शांति नाथ जैन यांनी केले तर आभार प्रदर्शन मा प्रणय पाटील यांनी केले.

# आहाराच्या माध्यमातून ॲनिमियाचे व्यवस्थापन करा: डॉ प्रणिता तौर

परळी । प्रतिनिधी

श्री पंडितगुरु पार्डीकर महाविद्यालय सिरसाळा, खोलेश्वर महाविद्यालय अंबाजोगाई. गृहविज्ञान विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने पोषण महा निमित्त दिनांक ९ सप्टेंबर २०२४ रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र सिरसाळा येथे आयोजित गरोदर मातांसाठी आहार जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.

याप्रसंगी त्या बोलत होत्या. पुढे बोलताना त्या म्हणाल्या महिलांमध्ये ॲनिमियाचे प्रमाण जास्त आहे. त्यातच गरोदर मातांना बाळ आणि स्वतःच्या पोषणाची जिम्मेदारी पार पाडायची असते.त्यामुळे सामान्य स्त्रियांपेक्षा गरोदर मातांची लोहाची गरज १/३ ने वाढलेली असते.ही गरज भागवण्यासाठी आहारामध्ये लोहयुक्त पदार्थांचा



समावेश करणे.उदा. बीट,हिरव्या पालेभाज्या ,आळूची पाने ,गुळ शेंगदाणे, आळीव या पदार्थांचा आहारात समावेश करून आपण ॲनिमिया पासून दूर राहू शकतो. गर्भावस्थेमध्ये आहारासोबतच पूरक म्हणून लोहयुक्त गोळ्या घेणे, हेही गरजेचे आहे.

या कार्यक्रम प्रसंगी गृहविज्ञान विभागाच्या विभाग प्रमुख प्रा.डॉ. उषा माने यांच्या संकल्पनेतून महिलांना आहाराच्या माध्यमातून हिमोग्लोबिनचं प्रमाण शरीरात वाढवण्यासाठी आहाराच्या संदर्भात काय काळजी घ्यावी यासंबंधीची माहिती पुस्तिका तयार करून महिलांना देण्यात आली. सोबतच आळीव या पदार्थाचे पाऊच वाटप करण्यात आले.व या आळीवपासून लाडू, खीर कशा पद्धतीने तयार करता येईल, याची पाककृती संबंधित पत्रकामध्ये देण्यात आली. यावेळी व्यासपीठावर प्राथमिक आरोग्य केंद्राच्या प्रमुख डॉ. कुलकर्णी मॅडम उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.डॉ.अरुणा वाळके यांनी केले.या कार्यक्रमासाठी आशा वर्कर ताई, गरोदर माता सोबतच दुग्ध सर्जन अवस्थेतील माताची उपस्थिती होती. या कार्यक्रमाचा २४ महिलांनी लाभ घेतला.

जाहीरनामा

धारुर येथील श्रीमती ए. बी. जोंधळे २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर धारुर

किरकोळ दिवाणी अर्ज क्र. २६६/२०२४

राहिबाई व इतर ३ वि. निरंक

अर्जदार यांनी मयत लव्हु पिता माणिक माने मौजे धारुर ता. धारुर जि.बीड हे दिनांक २४/०१/२०२४ रोजी स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय अंबाजोगाई ता. अंबाजोगाई जि. बीड येथे मयत झाल्याचे नमुद केले आहे.

त्यांच्या पश्चात अर्जदार क्र . १ राहिबाई भ्र. माणिकराव माने, वय ७६ वर्षे, धंदा घरकाम रा.बाराभाई गल्ली धारुर ता. धारुर जि. बीड, अर्जदार क्र . २ पंचफुला भ्र. लहु माने, वय : ४९ वर्षे, धंदा घरकाम रा. सदर, अर्जदार क्र . ३ अविनाश पिता लव्हू माने, वय २७ वर्षे, धंदा मजुरी रा. सदर, अर्जदार क्र . ४ राहुल पिता लहु माने, वय २१ वर्षे, धंदा मजुरी रा. सदर यांनी अर्जदार क्र . १ ही मयताची आई, अर्जदार क्र .२ ही मयताची पत्नी आणि अर्जदार क्र .३ व ४ हे मयताची मुले या नात्याने त्यांना शासकीय योजनेचा लाभ घेण्याकरीता, व इतर महत्त्वाच्या कामकाजाकरीता, वारस प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज या न्यायालयाकडे केला आहे. त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे मयत लव्हु पिता माणिक माने यांचे वारस नव्हे असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत त्याने या न्यायालयात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु मयत लव्हु पिता माणिक माने यांचे वारसांना वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दिनांक : ०९/०९/२०२४ रोजी न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख १४/१०/२०२४

आदेशावरून
स्वाक्षरित
सहा. अधिक्षक
दिवाणी न्यायालय क. स्तर धारूर

स्वाक्षरित
सी.के.पवार
क. लिपीक

शिक्का

# गोदावरी नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा यंत्रणेने सज्ज रहावे : जिल्हाधिकारी अविनाश पाठक

**बीड । प्रतिनिधी**

गोदावरी नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा असल्याने यंत्रणेने सज्ज राहावे, असे निर्देश जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी दिले.

जिल्हाधिकारी यांनी सोमवारी सायंकाळी प्रगती सभागृहात दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून गोदावरी नदीकाठच्या गांवाना सतर्कतेच्या अनुषंगाने आढावा बैठक घेतली. यावेळी जिल्हा परीषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संगीता देवी पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, तसेच दुरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून संबंधित विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते.



जायकवाडी प्रकल्प, नाथसागर जलाशय, पैठण येथुन गोदावरी नदीपात्रात सांडव्याद्वारे विसर्ग सुरू करण्यात आल्याने नदी काठच्या गावात आवश्यक उपाययोजना करण्यासाठीच्या सुचना जिल्हाधिकारी यांनी यावेळी दिल्या. यातंर्गत जायकवाडी प्रकल्प येथुन गोदावरी नदीपात्रात विसर्ग सुरू केल्यामुळे पिण्याचे स्त्रोत दुषीत झाल्यास पाणी पुरवठ्याचे शुद्धीकरण करणे, गरज पडल्यास टैंकर लावणे बाबत गटविकास अधिकारी, तहसीलदार यांनी तात्काळ उपाययोजना कराव्यात, तसेच तालुका आरोग्य अधिकारी, ग्रामिण रुग्णालय यांच्या सोबत संपर्क ठेवून कोणत्याही रोगाचा प्रादुर्भाव वाढणार नाही याकडे लक्ष देण्यात यावे. तसेच या कालावधीत नागरिकांना शुद्ध पिण्याचे पाणी पोहोच होईल याकडे विशेष लक्ष देण्याचे निर्देशित केले.

गोदावरी नदी किनारी असणाऱ्या लोकवस्तींना सावधगिरीच्या सुचना गावांमध्ये दवंडी देऊन व ईतर माध्यमातून देण्याचे ही निर्देशित केले.

अत्तिवृष्टीमध्ये सापांचा प्रादुर्भाव वाढत असल्याने सर्पदंश, डेंग्यूची लागण तसेच पावसाळ्यात उद्भवणाऱ्या रोगांकरीता इंजेक्शन, औषधांचा साठा प्राथमिक आरोग्य येथे उपलब्ध राहील याची जिल्हा शल्यचिकित्सक, बीड व जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद यांनी दक्षात घेण्याच्या सूचना केल्या .

नदीकाठी पाळीव जनावरे येणार नाहीत याची दक्षता घ्यावी. बऱ्याचदा पाण्याचा प्रवाह जास्त असतो प्रवाहामध्ये जनावरांची सांगाडे वाहत येतात, त्यांची व्यवस्था करण्याच्या सूचनाही जिल्हाधिकारी यांनी यावेळी दिल्या.

जायकवाडी प्रकल्पातून एक लाख क्युसेक्स पाण्याचा विसर्ग करण्यात आला तर खबरदारीसाठी जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी गावामध्ये अन्नधान्याची आगाऊ व्यवस्था करावी. मुख्य कार्यकारी अधिकारी, यांनी गेवराई व माजलगांव या तालुक्यांसाठी दोन अधिकाऱ्यांची नियुक्ती करून बाधित होणाऱ्या शेतक-यांबाबत त्वरीत कार्यवाही करावी, अशा महत्वाच्या सूचना यंत्रणेला जिल्हाधिकारी यांनी बैठकीत केल्या.

## आठवडी बाजारात मोबाईल चोरांना ग्रामस्थांनी रंगेहाथ पकडले

### चोप देत केले पोलिसांच्या स्वाधीन

माजलगाव । प्रतिनिधी

शहरापासून हाकेच्या अंतरावर असणाऱ्या सावरगाव येथे भरत असलेल्या मंगळवारच्या आठवडी बाजारात नागरिकांनी दोन मोबाईल चोर रंगेहाथ पकडले.यावेळी नागरिकांनी चोरट्यांना जाग्यावर चांगलाच चोप दिला.दरम्यान चोरट्यांना पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले असून त्यांच्यावर माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सावरगाव येथे दर मंगळवारी आठवडी बाजार भरतो.येथे भरणाऱ्या आठवडी बाजारात मागच्या काळात मोबाईल चोरीच्या अनेक घटना वाढल्या आहेत.दि १० सप्टेंबर मंगळवार रोजी सकाळी ११:०० वाजण्याच्या सुमारास बाजारासाठी आलेल्या गावातील एका इसमाचा मोबाईल खिशातून काढताना मोबाईल चोराला पकडले. त्याचे दोन साथीदार ही हा प्रकार पाहून पळत सुटले. दरम्यान पळणाऱ्या मोबाईल चोरांना नागरिकांनी पाठलाग करून पकडले.जमावाने पकडलेल्या दोन मोबाईल चोरांना जाग्यावर चांगलाच चोप दिला.त्यांचा एक साथीदार मोबाईलसह फरारी आहे.या घटनेनंतर

◀◀ पान ३ वर



पिंपळवंडी:-महालक्ष्मी अर्थात ज्येष्ठा गौरी,गौरी अर्थात संपत्तीची देवता,ज्येष्ठा गौरी लक्ष्मीचे प्रतीक आहे असे मानले जाते.त्या महालक्ष्मी गौरींचा तीन दिवसीय उत्सवाची सुरुवात दि.१०/०९/२०२४ मंगळवार रोजी घरोघरी झाली.पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील पत्रकार बबनराव उकांडे यांच्या निवासस्थानी सुवासिनींनी ज्येष्ठा गौरीचे उत्साहात स्वागत करून स्थापना केली.

## अंधारे मॅडम धरणं भरले, किमान चार दिवसाला पाणी सोडा -नवनाथ शिराळे

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरला पाणीपुरवठा करणारे बिंदुसरा धरण ओव्हरफ्लो झाले. तर माजलगाव बॅक वॉटर मध्ये पन्नास टक्के पेक्षा अधिक जलसाठा उपलब्ध आहे. गणपती, महालक्ष्मी सन चालू आहे. दसरा, दिवाळी तोंडावर असताना बीड करांना अजूनही पंधरा दिवसाला पिण्याचे पाणी मिळते. धरण उशाला आणि जलसाठा असूनही बीडकरांच्या घशाला कोरड कायम आहे. नागरिकांना पिण्याच्या पाण्यासाठी प्रशासक व नगरपालिकेचे सीओ अंधारे मॅडम यांनी वेठीस धरू नये. तातडीने किमान चार दिवसाला पिण्याचे पाणी सोडण्याचा निर्णय घ्यावा.



असे आवाहान भाजपाचे माजी नगरपरिषद सभापती नवनाथ शिराळे पाटील यांनी केले आहे.

बीड शहरातील नागरिक रहिवासी नगरपालिकेचा कर, पाणी पट्टी, घर पट्टी इमाने इतबारे वर्षाची वर्षाला नगरपालिकेला भरणा करतात. लाखो रुपयाचा कर व्याजासह बीड शहरातील नागरिक नगरपरिषद कडे भरणा करतात. या पैशाचा सदुपयोग करून

◀◀ पान ३ वर

## विमुक्त जातीतील बोगस राजपूत भामटा यांची घुसखोरी थांबवा

बीड । प्रतिनिधी

नुकत्याच एमबीबीएस प्रवेशप्रक्रीयेला सुरुवात झाली असून महाराष्ट्रातील विमुक्त जाती अ प्रवर्गात बोगस राजपूत भामटा ने प्रचंड घुसखोरी केली असून विमुक्त जाती प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांच्या तब्बल तिनशे पेक्षा अधिक जागा बोगस राजपूत भामटानी हडप केल्या आहेत यासाठी गोरबंजारा समाजातील अग्रेसर असलेल्या गोरसेना या सामाजिक संघटनेच्या वतीने आज संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हाधिकारी, तहसीलदार, उपविभागीय अधिकारी यांच्या मार्फत शासनाला निवेदन देऊन ही घुसखोरी थांबविण्याची विनंती केली आहे अन्यथा येणार्या



निवडणूकीत विद्यमान सरकारचा सुपडासाफ करण्याचा गर्भीत इशारा गोरसेनेने दिला आहे.

वमुक्त जाती अ मध्ये राजपूत भामटा या अत्यल्प लोकसंख्या असलेल्या जातीचा सामावेश असून नाम साधर्म्याचा फायदा घेत सवर्ण राजपूत, मिना,छप्परबंद या खुल्या प्रवर्गातील जनसमुदाय यांनी खुलेआम घुसखोरी करीत अभियांत्रिकी, वैद्यकीय, सह शासकीय नोकरभरतीत लाभ घेत आहे.राजपूत जातीतील लोक भामटा शब्द लावून भामटेगिरी करत असल्याने मुळ विमुक्त जाती अ प्रवर्गातील १४ तत्सम जाती आरक्षणाचे अतोनात नुकसान होत आहे म्हणून गोरसेना या संघटनेतर्फे संपूर्ण महाराष्ट्रात २०१९ पासून ठिकठिकाणी आंदोलने होत आहे. यासंदर्भात न्याय हक्क व अधिकारांसाठी गोरसेनेने राष्ट्रीय अध्यक्ष प्रा संदेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण राज्यात निवेदने दिलीत,नंतर जिल्हा स्तरावर रास्ता रोको करण्यात आले होते. मोर्चा आंदोलने गोरसेनेनी केले.तेव्हा विधीमंडळात विशेष तपासणी आयोग एस.आय.टी. नेमण्याची घोषणा दलीत बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी केली.मात्र राजकीय दबावाखाली येत त्यांनी दुसर्याच

◀◀ पान ३ वर

## गावच्या समस्या,तक्रारींवर दुर्लक्ष

### ग्रा.पं.मध्ये न आलेल्या ग्रामसेवकाच्या बदलीची मागणी

**माजलगाव । प्रतिनिधी**

तालुक्यातील फुलेपिंपळगाव च्या समस्या, तक्रारींवर दुर्लक्ष करत केवळ ग्रामसभेला उपस्थिती दाखवून पुन:ग्रामपंचायत मध्ये न आलेल्या ग्रामसेवक सुरेश वाघमारे यांची बदली करा अशी मागणी फुलेपिंपळगाव येथील सामाजिक कार्यकर्ते मनोज साळवे यांनी गटविकास अधिकारी यांना १०सप्टेंबर रोजी दिलेल्या निवेदनाद्वारे केली आहे. गटविकास अधिकारी पं.स.माजलगाव यांना दिलेल्या निवेदनात पुढे म्हटले आहे की,शहरातील एका अर्बन पतसंस्थचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा फुलेपिंपळगावचे सरपंच राहुल फुलगे हे ग्रा.पं.मध्ये उपस्थित न राहता ग्रा.पं.चा कारभार



त्या पतसंस्थेत बसुन हाकत आहेत.तर ग्रामसेवक सुरेश वाघमारे हे पदभारा नंतर केवळ ग्रामसभा घेऊन पुन:ग्रा.पं.कडे ढुंकूनही फिरकले नाहीत.गावातील काही भागात रस्ते,नाल्या नाहीत त्यामुळे सध्या तेथे गुढगे भर घाणी साचले असल्याने आहेत त्या कच्या वाटा चिखलमय झाल्याने महीला, लहान मुलांना जाण्या -येण्या साठी मोठी गैरसोय होत असुन त्यात पाऊस पडला तर त्या वाटा पण बंद होतात. सदर रस्त्याची पाहणी करून त्यावर मुरुम टाकण्याची मागणी सरपंच व ग्रामसेवका कडे केली होती पण दोघांनीही जाणीवपुर्वक केल्याने पाऊस पडल्यावर नागरीकांना

◀◀ पान ३ वर

## गणपती पाठोपाठ गौरींचेही उत्साहात आगमन



युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगाव येथे गणपतीच्या आगमनानंतर आज प्रत्येकाच्या घरी जेष्ठ गौरींचे अतिशय हर्ष उल्हासित वातावरणात स्वागत करण्यात आले.

दोन दिवसापुर्वी सर्वत्र गणेशाचे वाजतगाजत व आनंदमयी उत्साही वातावरणात स्वागत करण्यात आले होते तर आज दोन दिवसानंतर प्रत्येकाच्या घरी जेष्ठ गौरींचे पण आनंदमयी हर्ष उल्हासित वातावरणात स्वागत करण्यात आले आहे.खास करून हा सण महिला व बच्चे कंपनी वर्गात आनंदमयी वातावरण घेऊन येतो लक्ष्मीचा सण म्हणजे आरास भक्तिमय वातावरणात तर सणाच्या निमित्ताने प्रत्येक घरात गोडधोड व चमचमीत पदार्थ तयार होत असल्याने लहान-लहान मुलांना त्याचे आकर्षक असते असे असले तरी लक्ष्मीच्या आगमनाने प्रत्येक घरात भक्तीमय हर्ष उल्हासित वातावरणा निर्माण झाले आहे.

## मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या समारंभाची पूर्वतयारी बैठक संपन्न




**बीड । प्रतिनिधी**

मराठवाडा मुक्ती संग्रामदिनाच्या समारंभाची पूर्वतयारी बैठक निवासी

उप जिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांच्या अध्यक्षतेखाली आज जिल्हाधिकारी कार्यालयातील प्रगती सभागृहात पार पडली.या बैठकीस उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) शैलेश सुर्यवंशी, जिल्हा पुरवठा अधिकारी ओंकार देशमुख, तहसीलदार चंद्रकांत शेळके,

◀◀ पान ३ वर

## होमिओपॅथी महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त दिव्यांग रूग्णांसाठी शिबिर

**बीड । प्रतिनिधी**

होमिओपॅथी महाविद्यालयाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त जगप्रसिद्ध होमिओपॅथिक तज्ञ कै. डॉ प्रफुल्ल विजयकर यांच्या संकल्पनेतून आणि आधारस्तंभ श्री. जयदत्त अण्णा क्षीरसागर (माजी कॅबिनेट मंत्री, महाराष्ट्र सरकार) यांच्या प्रेरणेतून २००९ पासून सोनाजीराव क्षीरसागर होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज बीड येथे मतिमंद, गतिमंद, सेरेब्रल पल्सी ( ), कर्णबधीरता, मूकबधिरपणा, लहान मुलांचे असाध्य आजार, , झटके येणे () अशा विविध प्रकारच्या आजारांवर होमिओपॅथिक औषध-उपचार शिबिर आयोजित होत आहेत. आतापर्यंत जवळपास ५००० हून अधिक रुग्णांनी या शिबिराचा लाभ घेतला आहे.



हे शिबिर दर तीन ते चार महिन्यांच्या अंतराने नियमितपणे आयोजित होत आहेत. होमिओपॅथिक चिकित्सा पद्धतीच्या सिद्धांतानुसार रुग्णाची सखोल माहिती घेऊन होमिओपॅथिक औषध

## माजलगावात आ.सोळंकेंच्या सर्वपक्षीय समितीच्या वतीने सत्काराचे आयोजन

### सत्कार समितीच्या अध्यक्षपदी सुरेंद्र रेदासणी तर सचिव पदी अच्युत लाटे, मनोहर डाके, उमेश मोगरेकर

**माजलगाव । प्रतिनिधी**

राष्ट्रकुल संसदीय मंडळ महाराष्ट्र शाखा यांच्या वतीने महामहीम राष्ट्रपती द्रोपदी मुर्मु यांच्या हस्ते माजलगाव मतदार संघाचे आमदार प्रकाश सोळंके यांना उत्कृष्ट भाषणाबद्दल पुरस्कार देण्यात आला आहे. त्यानिमित्त माजलगाव मतदार संघातील सर्वपक्षीय नागरिकांच्या वतीने भव्य असा सत्कार सोहळा करण्याचे आयोजिले आहे. त्यासाठी काल मंगळवारी दिनांक १० सप्टेंबर रोजी माजलगाव कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभागृहात सर्व पक्ष व संघटनांची बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीत या नागरी सत्कार समारंभा निमित्त सर्वपक्षीय सत्कार समितीचे गठन करण्यात आले. या समितीचे अध्यक्ष म्हणून व्यापारी महासंघाचे तालुकाध्यक्ष सुरेंद्र रेदासणी यांची अध्यक्षपदी निवड करण्यात आली. तसेच सत्कार



समितीचे सचिव म्हणून अच्युत लाटे, मनोहर डाके, उमेश मोगरेकर, सहसचिव पदी रवींद्र कानडे, उमेश जेथलिया, नवनाथ धाईजे, कोषाध्यक्षपदी सुनील रुद्रवार, मार्गदर्शक म्हणून जयदत्त नरवडे, श्रीहरी मोरे व संभाजी शेजुळ यांची निवड करण्यात आली. तर दयानंद स्वामी, अरुण राऊत, मुसदिक बाबा, नारायण होके, तुकाराम येवले, कुणाल दुगड, अभय होके, राजेश घोडे, नासेरखान पठाण, महावीर मस्के, डॉ.वसीम मनसबदार, ॲड.अमित नाटकर, पप्पू धरपडे, संतोष यादव, शेषेराव जगताप, कचरू खळगे, पांडुरंग चांडक, प्रभाकर शेटे, ज्ञानेश्वर मेंडके, राजेश मेंडके, प्राचार्य सानप सर, संतोष जेथलिया, चंद्रकांत शेजुळ, दिलीप झगडे, परमेश्वर सोळंके, बन्सी मुंडे, सतीष रांजवन, दत्ता कांबळे, डॉ.यशवंत राजेभोसले, राकेश साळवे,

◀◀ पान ३ वर

## सतिश बलुतकर यांना आदर्श क्रीडाशिक्षक पुरस्कार प्रदान




**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

खोलेश्वर माध्यमिक विद्यालयातील क्रीडा शिक्षक सतिश बलुतकर यांना यावर्षीचा आदर्श क्रीडाशिक्षक पुरस्कार ज्येष्ठ नेते दत्ता पाटील यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला .

क्रीडा शिक्षक महासंघ शाखा अंबाजोगाई च्या वतीने दरवर्षी देण्यात येणारा यंदाचा आदर्श क्रीडाशिक्षक पुरस्कार सतिश बलुतकर त्यांना मुकूंदराज विद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात या पुरस्काराचे वितरण करण्यात आले.याप्रसंगी याबद्दल क्रीडा शिक्षक महासंघाचे तालुकाध्यक्ष सुनील देशमुख, शिवकुमार निर्मळे, दत्ता देवकते, ज्ञानेश मातेकर,रमण सोनाळकर, पिराजी कुसळे,सह सर्व क्रीडा शिक्षक उपस्थित होते.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा...नवे विचार...
पुणे विशेष
बुधवार दि.११ सप्टेंबर २०२४ । पान ७

# अर ट्रेडिंगच्या नावाखाली ७४ लाखांची फसवणूक करणाऱ्या टोळीला छत्रपती संभाजीनगरमधून बेड्या

**पिंपरी चिंचवड सायबर पोलिसांची कारवाई –**

**पुणे । प्रतिनिधी**

बनावट शेअर ट्रेडिंग पमध्ये गुंतवणूक करण्यास सांगून जास्तीचा नफा मिळवून देण्याचे (क्ळपक्षुरवळ)आमिष दाखवले. यातून हिंजवडी येथील एका व्यक्तीची ७४ लाखांची फसवणूक केली. याप्रकरणी पिंपरी-चिंचवड पोलिसांच्या सायबर सेलने छत्रपती संभाजीनगर येथील टोळीला बेड्या ठोकल्या.

साजिद शहा कासम शहा (वय ३०), अभिजित रामराव श्रीरामे (वय ३२, दोघेही रा. छत्रपती संभाजीनगर) अशी अटक केलेल्या आरोपींची नावे आहेत. त्यांच्या इतर साथीदारांचा शोध सुरू आहे.

पिंपरी-चिंचवड गुन्हे शाखेचे पोलीस उपायुक्त संदीप डोईफोडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, हिंजवडी येथील एका व्यक्तीने फसवणूक प्रकरणी हिंजवडी पोलीस



ठाण्यात फिर्याद दिली होती. जुलै २०२४ मध्ये फिर्यादी फेसबुक पाहत असताना ट्रेडींग बाबतची जाहिरात आली. जाहिरीतीमधील लिंक क्लिक केली असता, त्यांना एका व्हाटसअप ग्रुपमध्ये सहभागी करून घेण्यात आले. त्यानंतर संशयितांनी तक्रारदाराला प डाऊनलोड करण्यास सांगितले.

पमार्फत शेअर ट्रेडींगमध्ये गुंतवणूक केल्यास चांगला परतावा देण्याचे आमिष दाखवले. त्यातून व्यक्तीकडून बँक खात्यावर ७४ लाख घेऊन फसवणूक केली. या गुन्ह्याचा सायबर सेल मार्फत समांतर तपास सुरू होता. बँक खात्याबाबत तांत्रिक विश्लेषण केले असता, त्यामधील संशयित हे छत्रपती संभाजीनगरचे असल्याची माहिती मिळाली. त्यावरून सायबर सेलचे पथक छत्रपती संभाजीनगर येथे गेले. पथकाने तांत्रिक विश्लेषण करून खातेधारक साजिद आणि अभिजित श्रीरामे यांना ताब्यात घेतले. त्यांनी गुन्हा केल्याचे निष्पण झाले. त्यांच्याकडून तीन मोबाईल फोन जप्त केले. संशयितांनी फसवणुकीसाठी वापरलेल्या बँकेच्या खात्यावरून फसवणूक झाल्याप्रकरणी 'एनसीसीआर पोर्टल'वर ५६ तक्रारी दाखल आहेत. त्याच खात्यामध्ये चार कोटी रुपयांचे व्यवहार झाल्याचे समोर आले आहे. हिंजवडी पोलीस तपास करीत आहेत. ही कामगिरी सहायक पोलीस आयुक्त विशाल हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक रविकिरण नाळे, सहायक निरीक्षक प्रवीण स्वामी, उपनिरीक्षक सागर पोमण, पोलीस अंमलदार दीपक भोसले, अतुल लोखंडे, प्रिया वसावे, अशोक जावरे, श्रीकांत कबुले, अभिजीत उकीरडे यांच्या पथकाने केली.

# डोक्यात लोखंडी रॉड मारून व्यसनाधीन पतीचा पत्नीकडून खून

नारायणगाव: व्यसनाधीन पतीच्या त्रासाला कंटाळून पत्नीने पतीच्या डोक्यात लोखंडी रॉड मारला. वर्मी घाव बसून मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाल्याने पतीचा मृत्यू झाला. ही घटना सोमवारी रात्री नऊ वाजण्याच्या सुमारास औरंगपूर(ता. जुन्नर) येथे घडली.

देवराम सोमा डुकरे ( वय ५४ वर्षे रा.औरंगपूर, ता. जुन्नर जिल्हा पुणे ) यांचा खुन केल्या प्रकरणी नारायणगाव पोलिसांनी मृताची पत्नी दीपाली(वय ५०) हिच्यावर खुनाचा गुन्हा दाखल केला असून तिला ताब्यात घेतले आहे. देवराम डुकरे व त्याची पत्नी दीपाली हे दांपत्य आपल्या विवाहित मुली सोबत औरंगपूर येथील खंडोबामाळ येथे राहत होते. देवराम डुकरे यांना दारूचे व्यसन होते. या वरून या दाम्पत्यात नेहमीच भांडणे होत होती. दारूसाठी पैसे मिळावेत यावरून तो दिपालीला मारहाण करत असे.सोमवारी (ता.९) रात्री साडे आठ वाजण्याच्या सुमारास देवराम डुकरे हे दारूच्या नशेत घरी आले. नेहमीप्रमाणे त्यांनी पत्नी दीपालीशी भांडण सुरू केले. मला दारू प्यायला पैसे दे असा तगादा त्याने दिपाली हिच्याकडे लावला. पैसे देण्यास नकार दिल्याने त्याने पत्नी दिपालीला मारहाण करण्यास सुरुवात केली. रोजच्या शारीरिक,मानसिक त्रासाला कंटाळून दीपाली हिने पती देवरामच्या डोक्यात लोखंडी रॉड मारला. रॉडचा घाव वर्मी बसल्याने व रक्तस्राव होऊन देवराम यांचा जागेवरच मृत्यू झाला.





याबाबतची माहिती दिपाली यांनी सकाळी नातेवाईकांना सांगितली. आज सकाळी सात वाजता उपविभागीय पोलीस अधिकारी रवींद्र चौधर, सहाय्यक पोलीस निरीक्षक महादेव शेलार यांनी घटनास्थळी भेट दिली. घटनेचा पंचनामा करून नारायणगाव ग्रामीण रुग्णालयात मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात आले.या प्रकरणी देवाराम डुकरे यांची मुलगी रंजनी गांजवे यांनी नारायणगाव पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

# पूजा खेडकरप्रमाणे पुणे मनपात ६ बोगस दिव्यांग अधिकारी ?

**बोगस प्रमाणपत्र घेतल्याचा संशय, तपासणी करण्याच्या सूचना**

**पुणे । प्रतिनिधी**

राज्यासह देशात चर्चेत आलेल्या माजी आयएएस ट्रेनी अधिकारी पूजा खेडकर (झेक्षर घहशवङ्गरी) प्रकरणानंतर आता पुन्हा अशी काही प्रकरणे समोर येऊ लागली आहेत. पूजा खेडकर प्रमाणे पुणे महापालिकेतील सहा इंजिनिअर्सनी दिव्यंगत्वाची खोटी प्रमाणपत्रे मिळवल्याचा दिव्यांग आयुक्तालयाला संशय आहे. या सहा अधिकाऱ्यांच्या बद्दल तक्रार प्राप्त झाल्यानंतर दिव्यांग विभागाने त्यांची कागदपत्रे तपासली आहेत. त्यातून संशय आणखी बळावल्याने दिव्यांग आयुक्त प्रवीण पुरी यांनी पुणे महापालिकेचे आयुक्त राजेंद्र भोसले यांना पत्र लिहून या सहा इंजीनियर्सची



वैद्यकीय तपासणी करायला सांगितली आहे.

मात्र, या पत्राला एक महिना उलटला असला तरी देखील अद्याप पुणे महापालिकेने या इंजिनियर्सची वैद्यकीय तपासणी केलेली नाही. वेगवेगळ्या कालावधीत हे इंजिनियर्स पुणे महापालिकेत दाखल झाले असून वेगवेगळ्या पदांवर काम करत आहेत. त्यांच्यावर देखील दिव्यंगत्वाची खोटी प्रमाणपत्रे मिळवल्याचा संशय व्यक्त केला जात आहे.

# शिवरायांची समाधी टिळकांनी शोधली !

## मोहन भागवत यांचे वादग्रस्त विधान, वक्तव्यावरून वाद निर्माण होण्याची शक्यता

**पुणे । प्रतिनिधी**

मालवण येथील राजकोट किल्ल्यामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुर्णाकृती पुतळा कोसळल्यानंतर राज्यातील सत्ताधारी महायुती सरकारवर आणि स्थानिक भाजपा आमदार खासदारांवर मोठ्या प्रमाणावर टीका झाल्या. या घटनेमुळे महायुती सरकार धास्तावले असतानाच आता राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक प्रमुख मोहन भागवत यांनी शिवरायांच्या समाधीवरुन केलेल्या विधानामुळे आता पुन्हा एकदा वादंग निर्माण होण्याची स्थिती निर्माण झाली असून पुन्हा एकदा भाजपा प्रणित महायुती सरकार आणि भाजपा बॅकफूटवर येण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

पुण्यातील एका कार्यक्रमात बोलताना सरसंघचालक मोहन भागवत हे छ्त्रपती शिवाजी महाराजांचा दाखला देताना म्हणाले की, इंग्रजां विरुद्ध लढणारे शिवाजी महाराज इथेच होऊन गेले. इथे सुद्धा त्यांचे स्मरण



व्हावे म्हणून जागरण केले. रायगडावर उत्सव सुरु केला. टिळकांनीच रायगडावरील छत्रपती शिवरायांची समाधी ते सर्व शोधून काढले अशा प्रकारचे वादग्रस्त वक्तव्य केले. तसेच रवींद्रनाथ टागोर यांनी शिवाजी महाराजांवर कविता लिहिली अशा प्रकारचे वक्तव्य करत विधानसभा निवडणूकांच्या पार्श्वभूमीवर वादंग निर्माण करण्याचा प्रयत्न केला आहे.

राज्य सरकारने काही वर्षांपुर्वी प्रकाशित केलेल्या महात्मा फुले यांच्या समग्र चरित्र खंडात रायगडावरील शिवछत्रपती शिवाजी महाराज यांची समाधी महात्मा फुले यांनी शोधून काढल्याचा आणि शिवाजी महाराजांवर पहिला पोवडा लिहिल्याचा उल्लेख आहे. त्यानंतर बऱ्याच वर्षानंतर लोकमान्य टिळक यांनी शिवाजी महाराजांबद्दल उल्लेख केल्याची नोंद राज्य सरकारच्या पुस्तकात आहे. या गोष्टी सरकारकडे नोंदणीकृत असलेल्या पुस्तकात माहिती असताना राष्ट्रीय स्वंयसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांनी शिवाजी महारांची समाधी शोधण्याचे श्रेय लोकमान्य टिळकांना देत पुन्हा एकदा इतिहासाची मोडतोड राष्ट्रीय स्वंयसेवक संघाकडून सुरु असल्याची चर्चा इतिहास प्रेमी आणि शिवप्रेमींमध्ये सुरु झाली आहे.

सरसंघचालक मोहन भागवत यांचा दावा राष्ट्रवादीचे मंत्री छगन भुजबळ यांनी मात्र मोहन भागवत यांचे वक्तव्य खोडून काढत, छत्रपती शिवाजी महाराजांची रायगडावरील समाधी महात्मा ज्योतिबा फुले यांनीच शोधून काढली. त्यांनीच शिवजयंती साजरी केली. तसेच शिवाजी महाराज यांच्यावर त्यांनीच पहिला पोवाडा लिहिल्याचे सांगत मोहन भागवत यांचा दावा खोडून काढला. तर काँग्रेस नेते तथा विरोधीपक्ष नेते विजय वडेट्टीवार यांनी मोहन भागवत यांच्या त्या वक्तव्यावर टीका करताना म्हटले की, मोहन भागवत यांची भूमिका दिशाभूल करणारी आहे. शिवाजी महाराज यांची समाधी महात्मा ज्योतिबा फुले यांनी शोधली. याचे इतिहासात पुरावे आहेत. संघाचे लोक काहीपण शोध लावेल. त्यांचे मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्रीही म्हणतात की सूरत शिवाजी महाराजांनी लुटली नाही. इतिहासा संदर्भात आता भाजपा नेते काहीही बोलत असल्याची टीका केली.

## शिव कामगार सेनेची कामगार परिषद रविवारी

**पुणे । प्रतिनिधी**

शिवसेना प्रणीत शिव कामगार सेनेची राज्यस्तरीय कामगार परिषद रविवारी (ता. १५) आयोजित करण्यात आली आहे. ही परिषद सदाशिव पेठ येथील उद्यान प्रसाद मंगल कार्यालय येथे दुपारी चार वाजता होईल, अशी माहिती शिवसेना भवन पुणे कार्यालय प्रमुख सुधीर जोशी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

या कार्यक्रमास केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव, खासदार श्रीरंग बारणे, शिवसेनेचे विधानसभा प्रतोद आमदार भरत गोगावले, शिव कामगार सेनेचे प्रदेश अध्यक्ष सुधीर कुरुमकर, प्रसिद्धी प्रमुख राजेंद्र सोनार आदी उपस्थित राहणार आहेत. यावेळी संघटित व असंघटित कंत्राटी कामगारांसाठी केंद्र व राज्य सरकारच्या कल्याणकारी योजनेच्या पुस्तिकेचे प्रकाशन करण्यात येणार आहे. तसेच कामगारांसाठी आवश्यक कीट वाटप करण्यात येणार आहे, असे जोशी यांनी सांगितले.

# सुखसागर स्थानकात तपमहोत्सवाचे आयोजन

**कात्रज । प्रतिनिधी**

सुखसागरनगर आणि कोंढवा येथील जैन समाज एकत्र येऊन ऐतिहासिक चातुर्मास सुरू आहे. पर्युषण पर्वातील महत्त्वाच्या अशा संवत्सरीया दिवशी जवळपास ५००० लोकांच्या उपस्थितीत क्षमापनाचा कार्यक्रम झाला. या वेळी सुखसागर जैन स्थानकात तपमहोत्सवाचे आयोजन केले होते.

प. पू सौरभमुनीजी, गौरवमुनीजी म. सा. आदी ठाणा, पुण्यशीलाजी म. सा. आदी ठाणा यांच्या सानिध्यात सुखसागर श्रावक संघाच्यावतीने सर्व तपस्वीचा भव्य वरघोडा काढून स्वागत सन्मान करण्यात आला. कोंढव्यातील चोरडिया बंधू यांच्या निवासस्थानापासून तपस्वींच्या वरघोड्याचे केले होते. या चातुर्मासमध्ये आणि संवत्सरी काळात दोन मासखमण, पाच-पंधरा उपवास, चार-अकरा उपवास, बारा-नऊ उपवास, ८२ आठ उपवास, १५ पाच उपवास, ४६५ तेले, ५०० बेले, हजारो १ उपवास, ८५० आयबील, ३१३ पद्मावती एकासना, ७० एकसाना मासखमण, २५० द्या पोषध, असे अनेक तप झाले.संघाच्यावतीने काढण्यात आलेल्या तपस्वीचा वरघोड्यामध्ये हजारो नागरिक सहभागी झाले होते. याठिकाणी चार्तुमासच्या पहिल्या दिवसापासून अखंड नवकार महामंत्र जाप करण्यात आल्याची माहिती संघाचे अध्यक्ष पुखराज हिरण, कार्यक्रमाचे अध्यक्ष विवेक गोलेची यांनी दिली.

या वेळी आमदार योगेश टिळेकर यांच्यासह राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून गुरू महाराजांचे आशीर्वाद घेतले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी विवेक गोलेचा, विजय नहार, राजकुमार लोढा, नितीन मंडलेचा, अशोक सालेचा, प्रदीप बोरा, प्रमोद कांकरिया, किरण संचेती, सागर राका, गणेश चोरडिया, नितीन चोरडिया, मनीष ओस्तवाल, वैभव धोका, शेवंतीलाल लुंकड, मनोज धोका, पंकज चुतर, प्रमोद संचेती, देवेंद्र बोरा, महावीर छाजेड, ललित कटारिया यांनी प्रयत्न केले.

## सहायक आयुक्त सीताराम बहुरे यांची उपायुक्तपदी बढती

**पुणे । प्रतिनिधी**

महापालिकेच्या सहाय्यक आयुक्त पदावरील अधिकाऱ्यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव



कालावधी, सेवाजेष्ठता, गोपनीय अहवाल, मत्ता व दायित्व, संगणक अर्हता, शिस्तभंग विषयक कारवाई हे सर्व सेवाविषयक तपशील पडताळून सीताराम बहुरे यांना शासन मान्यतेच्या अधिन राहून तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्याच्या निर्णयास आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी स्थायी समिती बैठकीत मान्यता दिली. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सहाय्यक आयुक्त पदावर कार्यरत (झउचउ) असणारे सीताराम बहुरे यांची उपआयुक्त पदी पदोन्नती झाली असून ते सध्या फ क्षेत्रीय कार्यालयामध्ये क्षेत्रीय अधिकारी म्हणून कामकाज पाहत आहेत.

# मुख्य विसर्जन घाटांवर वैद्यकीय पथकांची नियुक्ती

पुणे । प्रतिनिधी

शहरातील प्रमुख गणेश विसर्जन घाटांवर महापालिकेच्या वतीने ११ सप्टेंबर ते १७ सप्टेंबर २०२४ या कालावधीत दुपारी ३ ते रात्री १० वाजेपर्यंत वैद्यकीय पथकांसह सुसज्ज रुग्णवाहिका तैनात ठेवण्यात येणार असल्याची माहिती आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांनी दिली आहे.

यंदाचा गणेशोत्सव दरवर्षीप्रमाणे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येत आहे. त्यासाठी महापालिकेच्या वतीने नागरिकांच्या सोयीसाठी विविध सेवा सुविधा पुरविण्यात येत आहे.

त्या अनुषंगाने प्रमुख विसर्जन घाटांच्या ठिकाणी वैद्यकीय पथके तैनात ठेवण्यात येणार आहेत. त्यामध्ये निगडी प्राधिकरणातील गणेश तलाव, वाल्हेकरवाडी मधील जाधव घाट, काळेवाडी मधील स्मशान घाट, पिंपळे गुरव घाट, वाकड गावठाण घाट, मोशी नदी घाट, चिखली स्मशान घाट, थेरगाव पूल नदी घाट, सुभाषनगर पिंपरी घाट आणि सांगवी येथील वेताळबाबा मंदिर घाट या विसर्जन घाटांचा समावेश आहे. याठिकाणी वैद्यकीय पथकांसोबत वैद्यकीय साहित्य, औषधे आणि (झळाीिळ) सुसज्ज रुग्णवाहिका तैनात ठेवण्यात येणार आहे. या वैद्यकीय पथकांमध्ये



वैद्यकीय अधिकारी, स्टाफ नर्स, ब्रदर, वॉर्ड बॉय, रुग्णवाहिका वाहनचालक सफाई कामगार आदींचा समावेश आहे. या सर्व पथकांमध्ये समन्वय साधण्यासाठी मुख्य समन्वय अधिकारी म्हणून सहाय्यक आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. किशोरी नलावडे यांची नेमणूक करण्यात आली आहे.

# दिवंगत विठ्ठलराव तुपे नाट्यगृहाचे सौंदर्य अबाधित राहण्याच्या दृष्टीने विशेष लक्ष द्यावे - अजित पवार

पुणे । प्रतिनिधी

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुणे महानगरपालिकेच्या हडपसर येथील राजर्षी शाहू महाराज संकुलामधील दिवंगत विठ्ठलराव तुपे नाट्यगृहाला सदिच्छा भेट देऊन पाहणी केली. यावेळी नाट्यगृहाचे सौंदर्य अबाधित राहील यादृष्टीने स्वच्छता, नियमित देखभाल दुरुस्ती याकडे विशेष लक्ष द्यावे, असे निर्देश त्यांनी यावेळी दिले.



यावेळी आमदार चेतन तुपे, पुणे महानगरपालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले, माजी महापौर वैशाली बनकर, शहर अभियंता प्रशांत वाघमारे, उपायुक्त (सांस्कृतिक) सुनील बल्लाळ, मुख्य अभियंता (भवन) युवराज देशमुख, हडपसर क्षेत्रीय कार्यालयाचे सहायक आयुक्त बाळासाहेब ढवळे पाटील, माजी स्थायी समिती अध्यक्ष बाबुराव चांदेरे, माजी नगरसेवक सुनील बनकर आदी उपस्थित होते.

यावेळी उपमुख्यमंत्री पवार म्हणाले की, पुणेकरांना मुळातच नाटकाची आवड आहे. त्यामुळे येरवडा, वडगाव शेरी, पिंपरी-चिंचवड आदी भागांसह हडपसर येथे अद्ययावत नाट्यगृह असण्याची गरज होती. हडपसर येथे दिवंगत विठ्ठलराव तुपे नाट्यगृहाचे काम झाल्यामुळे येथील नाट्यप्रेमी, कलाप्रेमींना लाभ होणार आहे.

यावेळी आयुक्त डॉ. भोसले यांच्याशी चर्चा करताना ज्या इमारती अगदी थोड्या निधीअभावी अपूर्ण आहेत त्या पूर्ण कराव्यात, असे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले. यानुसार २२ अपूर्ण इमारतींना प्राधान्याने निधीची तरतूद करुन पूर्ण करण्याचे नियोजन करण्यात आले असल्याचे डॉ. भोसले यांनी सांगितले.

नाट्यगृहाचे भाडे १०हजार रुपये ठेवण्याचे नियोजन करण्यात (झींपश) आल्याचे आयुक्तांनी सांगितले. त्यावर नाट्यनिर्माते, दिग्दर्शकांशी बैठक घेऊन महानगरपालिकेलाही परवडेल आणि नाट्यनिर्मात्यांनाही परवडेल असे भाडे निश्चित केल्यास अधिकाधिक नाटकांचे खेळ होऊन महापालिकेला नाट्यगृहाच्या देखभालीसाठी उत्पन्न मिळू शकेल. नाट्यगृहाच्या छतावर सौर पॅनेल बसून वीज निर्मिती करता येईल तथापि, छोट्या आकारात जास्त वीज तयार करणारे अत्याधुनिक सौर पॅनेलचे तंत्रज्ञान येत असल्याने त्यादृष्टीने निर्णय घ्यावा, अशी सूचनाही त्यांनी केली.



# झाडे जगवणाऱ्या हातांचा गौरव

**पुणे । प्रतिनिधी**

पावसाळ्यात झाडे लावून त्यांचे संगोपन करण्याची जबाबदारी घेणाऱ्या हातांचा गौरव करण्यात आला. नवसंकल्प फाउंडेशन कडून हा उपक्रम (चरींश्र) राबविण्यात आला. ज्या व्यक्ती आणि संस्थांनी वृक्षारोपण करण्यासाठी मदत केली त्यांचा नुकताच सत्कात केला.

यावेळी बॉश कंपनीचे चाकणचे प्लांट मॅनेजर विनोद व्यंकटेश, श्रीकांत गायकवाड, ओमकार पवार नियतक्षेत्र वन अधिकारी बेबडओहळ योगेश कोकाटे, नव संकल्प फाउंडेशनचे सर्व पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.

घोरेडेश्वर डोंगरावर नवसंकल्प फाउंडेशन तर्फे जून, जुलै, ऑगस्ट महिन्यात मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करण्यात आले. सदर वृक्षरोपण वड, पिंपळ, कडूलिंब, आंबा, चिंच, फणस, जांभूळ, आर्जुन इतर जंगली देशी वनस्पती व औषधी वनस्पतीचे वृक्षारोपण संस्थेतर्फे करण्यात आले. वृक्षारोपण करण्यास विशेष सहकार्य लाभलेल्या वनपरिक्षेत्र अधिकारी वडगाव मावळ, बॉश कंपनी, गायकवाड नर्सरी, तसेच पवार नर्सरी यांचे राहिले. या सर्वांचा सत्कार (चरींश्र) करण्यात आला.